# कांहीं तरी

हरि सखाराम गोखले
यांचा

## कवितासंग्रह

प्रस्तावनालेखक
रामचंद्र कृष्ण लागू, एम्. ए.
प्रोफेसर ऑफ इंग्लिश, न्यू पूना कॉलेज, पुणें.

संग्राहक
श्री० दिनकर गंगाधर केळकर

१९२५

किंमत १ रुपया

मुद्रक व प्रकाशकः—अनंत सखाराम गोखले,
'विजय' प्रेस, ५७० शनवार, पुणें.

[ सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन ]

# कांहींतरी

[ माझ्या कवितासंग्रहाचें नांव 'कांहींतरी' ]

[ शार्दूलविक्रीडित ]

ह्या मोठ्या जगतास अल्प इतुकें हें होय 'कांहींतरी'
ज्ञानेशादि महान् कवी खचित हें भाषेस 'कांहींतरी'
कोणाला खपलें कुणास खुपलें त्यांनाहि 'कांहींतरी'
माझें–मद्हृदयांतलें–म्हणुनि जें तें हेंच 'कांहींतरी'

१ डिसेंबर १९२२.

हरि सखाराम गोखले.

# शुद्धिपत्र

[ कांहीं ठळक चुकांचें शुद्धिपत्र खालीं दिलें आहे.]

| पृष्ठ | ओळ | मुद्रित | मूळ |
|---|---|---|---|
| १२ | ७ | भीतिनिराश– | भीतिनिराशा |
| ३८ | १४ | आरशामध | आरशामधें |
| ४० | २० | दान | दीन |
| ६३ | ४ [ आयुष्य ] | ? | ! |
| ७३ | ३[ भैरवी ] | 'करिं न मिळुनी' (याचे पुढें) | हृदयसुमनीं |
| ८१ | ८ | लहान असली तरीहि ताइ | ···ताई |
| ,, | १२ | दिल्याचाही | दिलाचाही |
| ,, | १९ | मातापितरांनीं | मातापितयांनीं |
| ८२ | ७[संध्याकाळ] | 'झालें वर्ष पुढें' (याचे पुढें) | न |
| ९६ | ४[सोनचांफ्यास] | निदिलें | निंदिलें |
| ९९ | २[–साठीं आणलेलीं फुलें] | पीडा | पाडी |
| १०२ | १२ | आज्ञानें | अज्ञानें |
| १०३ | ५[नदी आणि मानिनी] | तुझी तूं जाई। इतुकी (याचे पुढें) | मी |
| १०४ | ७[झोंपडी व संध्याकाळ] | सुखे | सुख |
| ११८ | ९ | आसरा | आरसा |
| १३१ | ९ | रूप... | रूप... |

## प्रस्तावना

| पृष्ठ | ओळ | मुद्रित | मूळ |
|---|---|---|---|
| ५ | २ | असें म्हणायला हरकत कांहीं नाहीं | ...कांहीं हरकत नाहीं |
| १६ | नवा पॅरा [ आरंभ ] | ह्याप्रमाणेंच | ह्याप्रमाणें |
| २९ | १३ [ शेवट ] | अशीच | अशी |

# अनुक्रमणिका


| कवितेचें नांव | पृष्ठ |
| --- | --- |
| १ ईश्वर | १ |
| २ चांदोबाची गंमत | २ |
| ३ दारिद्र्याचे विलास | ३ |
| ४ मी कोण ? | ४ |
| ५ खुळें प्रेम | ५ |
| ६ दयाघन गौतम | ६ |
| ७ एक गोड पापा | ८ |
| ८ फूल कुस्करलें तरी– | १० |
| ९ कुणासाठीं ? | ११ |
| १० चित्त शुद्ध करशील तर | १२ |
| ११ तारागणाकडे पाहून | १३ |
| १२ श्रीशारदेस | १४ |
| १३ प्रीति आणि नदी | १५ |
| १४ सविता, समीर आणि सरिता | १६ |
| १५ खरा थोर एकटा देव | १७ |
| १६ आईसाठीं आणलेलें फूल | १८ |
| १७ एक जुनी व नवी गोष्ट | २१ |
| १८ माळ फुलांची; पण त्रास ? | २४ |
| १९ देवा | २७ |
| २० अश्रूंचा पाऊस | २८ |
| २१ पैसाफंडाचे श्लोक | ३१ |
| २२ ७।८ वर्षांच्या एका बालिकेस पाहून | ३३ |
| २३ महात्मा गांधी | ३५ |
| २४ सिंहगडावरची सकाळ | ३६ |
| २५ ऐका आणि पहा | ३८ |
| २६ कांहीं अलौकिक पाहिल्यावर | ३९ |
| २७ सीतेचें गाणें | ४० |
| २८ दीनांचा विश्वास | ४१ |
| २९ प्रार्थना | ४२ |
| ३० जुना बाजार | ४३ |
| ३१ पतंगाचा पोवाडा | ४५ |
| ३२ तगरीचें फूल | ४७ |
| ३३ लांकूड व लोखंड | ४८ |
| ३४ अशिक्षित दारूबाजास | ४९ |
| ३५ नेपोलियनास | ५० |
| ३६ मंजुळीचा दादा | ५१ |
| ३७ क्षणांत उलगडा | ५५ |
| ३८ तासाचा ठोका | ५६ |
| ३९ वैतागलेला | ५६ |
| ४० पांखराचें घरटें आणि एक मुलगा | ५७ |
| ४१ विसंवाद | ५९ |
| ४२ रोज पैसा मागणाऱ्या भिकाऱ्यास | ६० |
| ४३ बसल्याबसल्या गाणें | ६० |
| ४४ भिडेखातर | ६१ |
| ४५ जळजळ | ६२ |
| ४६ आयुष्य | ६३ |
| ४७ लेखणी | ६३ |
| ४८ एका चित्रास | ६३ |
| ४९ माघमासीं पाऊस | ६४ |
| ५० जगाचें वर्णन | ६४ |
| ५१ चूक | ६५ |

| कवितेचें नांव | पृष्ठ |
|---|---|
| ५२ एक गोड विचार | ६६ |
| ५३ नटवर्य गणपतराव जोशी | ६७ |
| ५४ मोहिनी | ६८ |
| ५५ बाळांनों | ६९ |
| ५६ दूर्वा, बेल आणि तुळशी | ७० |
| ५७ आवडत्या कवितेस | ७१ |
| ५८ हा कोण ? | ७१ |
| ५९ आग | ७२ |
| ६० संध्याकाळ | ७३ |
| ६१ भैरवी | ७३ |
| ६२ हृद्गत आणि अश्रु | ७४ |
| ६३ स्वातंत्र्याची प्रकृति | ७४ |
| ६४ संध्याकाळ | ७५ |
| ६५ पाठमोरी | ७५ |
| ६६ उदास कविता | ७६ |
| ६७ जांवयाला तांब्या | ७६ |
| ६८ तोंपर्यंत | ७७ |
| ६९ खैबरखिंड | ७७ |
| ७० काकुडलेला | ७८ |
| ७१ केशवसुतांच्या कवितेच्या शेवटच्या पानावर | ७८ |
| ७२ गरीब आईचें गाणें | ७९ |
| ७३ कांहीं पानें | ८० |
| ७४ आपुलकीचें गीत | ८१ |
| ७५ संध्याकाळ | ८२ |
| ७६ त्याच जुन्या श्लोकाची आठवण | ८३ |
| ७७ गौरीशंकर | ८४ |
| ७८ एक घाव | ७४ |

| कवितेचें नांव | पृष्ठ |
|---|---|
| ७९ सालाबाद | ८५ |
| ८० चतुष्टय | ८५ |
| ८१ समाधान | ८६ |
| ८२ चतुर चोरी | ८६ |
| ८३ आह्वान | ८७ |
| ८४ विलक्षण वाटसरू | ८७ |
| ८५ त्यानें मजला हांसविलें | ८८ |
| ८६ आयुष्याची घडी | ८९ |
| ८७ उद्यांची गोष्ट | ८९ |
| ८८ माझे ग्रह | ९० |
| ८९ नवा शब्द | ९० |
| ९० वहीची ओळख | ९१ |
| ९१ ती एकटी | ९१ |
| ९२ दसऱ्याचें सोनें | ९२ |
| ९३ तात्पर्य | ९२ |
| ९४ पर्वतीचें तळें | ९३ |
| ९५ दोघांसही | ९३ |
| ९६ काळनदीवर | ९४ |
| ९७ दाराची कडी | ९४ |
| ९८ करुणा | ९५ |
| ९९ फूल आणि उदकाडी | ९६ |
| १०० सोनचांफ्यास | ९६ |
| १०१ चित्र | ९६ |
| १०२ मित्रा | ९७ |
| १०३ अरुणजन्म अथवा स्वातंत्र्यासाठीं प्रयत्न | ९८ |
| १०४ —साठीं आणलेलीं फुलें | ९९ |
| १०५ एक ग्रंथ | १०० |
| १०६ एक भेत | १०० |

| कवितेचें नांव | पृष्ठ |
|---|---|
| १०७ तशी ती रूपानें सुरेख नाहीं | १०१ |
| १०८ विचार आणि विकार | १०१ |
| १०९ चार वर्षांच्या मुलीची गोष्ट | १०२ |
| ११० नदी आणि मानिनी | १०३ |
| १११ वियुक्ताचे उद्गार | १०३ |
| ११२ झोंपडी आणि संध्याकाळ | १०४ |
| ११३ तुमच्यासाठीं | १०५ |
| ११४ आई आणि देव | १०५ |
| ११५ घड्याळापाशीं दोनशब्द" | |
| ११६ तुझ्याविषयीं | १०६ |
| ११७ गिळलेला अश्रु | १०६ |
| ११८ अनिवारपणानें– | १०६ |
| ११९ शाळेंत जातांना | १०७ |
| १२० फुलांचा राग करूं नको | १०८ |
| १२१ होवो. पण होऊं नये | १०८ |
| १२२ जलभरण | १०९ |
| १२३ मोहनमाळ | १०९ |
| १२४ नेपोलिअन आणि न्यूटन | ११० |
| १२५ वर्षाकाल | १११ |
| १२६ आशा आणि अनुभव | ११२ |
| १२७ भैरवी | ११२ |
| १२८ किंचित् नवल | ११३ |
| १२९ प्रवासी | ११४ |
| १३० दुःखाची कहाणी | ११५ |
| १३१ भावना आणि कल्पना | ११६ |
| १३२ देवदर्शन | ११६ |
| १३३ पक्षी आणि सुगंध | ११७ |
| १३४ तुझें प्रतिबिंब | ११८ |
| १३५ माझा आवडता दगड | ११९ |
| १३६ आमची सोनी | १२० |
| १३७ कधींकाळीं | १२१ |
| १३८ वाढदिवसाचें हृद्गत | १२१ |
| १३९ स्मृति | १२२ |
| १४० मंजुळ, प्रेमळ आणि कोमल | १२३ |
| १४१ मला नकोसा मी | १२३ |
| १४२ दुष्काळांतलें उत्पन्न | १२४ |
| १४३ काळाची निष्ठुरता | १२४ |
| १४४ वस्तु आणि मनुष्य | १२५ |
| १४५ औरंगज़ेब | १२५ |
| १४६ दिवा आणि कविता | १२६ |
| १४७ अज्ञान | १२७ |
| १४८ दुर्भाग्य | १२८ |
| १४९ आशेला अंत नाहीं | १२९ |
| १५० कृति आणि कीर्ति | १२९ |
| १५१ परागंदा | १३० |
| १५२ तत्त्व आणि स्थिति | १३३ |
| १५३ एक नी एक तीन ! | १३३ |
| १५४ विकसन | १३३ |
| १५५ मैत्री | १३४ |
| १५६ वीज | १३४ |
| १५७ स्वर्गारोहण | १३५ |
| १५८ निवेदन | १३६ |

# समर्पण.

[ वसंततिलका ]

आई, तुझेच गुण जे दिसतात माझे
पुष्पांतले सुगुण ते सगळे लतेचे
त्यांनींच दिव्य कविता मज प्राप्त झाली
ती मीं तुझ्या चरणिं सादर अर्पियेली !

# कांहीं तरी

## ईश्वर.

[ चाल–उगवो तो वैभवरवि० ]

लीलेनें सहज सतत सकल विश्व ईश खेळवी
निर्मी ही रुचिर धरा। नीलांबर अमृतकरा
अरुण उषा तिमिरहरा। अतुल थोरवी
चंद्रसूर्य तो फिरवी। तारागण तो खुलवी
कुमुदनलिनि तो हंसवी। अखिल भूलवी
अचल गिरी तेथ वसे। चपलांतरिं तो विलसे
सरितेसह घे वळसे। भेद नाठवी
तो वसंत कोकिलास। जलदबिंदु चातकास
प्रिय सुधांशु त्या निशेस। तोच भेटवी
हृदयांतरिं तोचि वसे। ज्ञानाचें लावि पिसें
बोधाचे सतत ठसे। तोच उमटवी
त्यासमान नाहिं कुणी। सकलांचा तोच धणी
अतुल नित्य तत्करणी। सहज गुंगवी
प्रेमाचें आलोकन। करुणेचें हृदयासन
दीनाचें वाक्य–श्रवण। ब्रीद चालवी

नोव्हेंबर १९१५.

## चांदोबाची गंमत.

[ चाल—आनंदी आनंद गडे.]

ये ये ताई पहा पहा
गंमत नामी किती अहा!
चांदोबा खालीं आला
हौदामध्यें बघ बुडला
कसा उतरला?। किंवा पडला?। पाय घसरला?
कशास उलटें चालावें—
पाय नभाला लावावे?
किती उंच हें आभाळ
तेथुनि हौद किती खोल
तरि हा ताई। आई आई। बोलत नाहीं
चांदोबा तूं रडूं नको!
ताई तूं मज हंसूं नको.
किती किती हें रडलास
हौद रडण्यानें भरलास
तोंड मळविलें। अंग ठेचलें। तेज पळालें
उलटा चालूं नको कधीं
पडशिल ऐसा जलामधीं.

१९१५.

# दारिद्र्याचे विलास.

[ वसंततिलका.]

देतें नरास बहु कष्ट घडीघडीला
पाडी महाव्यसनिं दूषवि सन्मतीला
शांती विनष्ट करि अक्षयिंचा उदास
दारिद्र्य नित्य जगतीं करि हे विलास !

मानी जनांस अपमानिंच लोळवीतें
क्षुद्रापुढें कितिकदां तरि वांकवीतें
जेथें तिथें अपयशी करितें नरास
दारिद्र्य नित्य जगतीं करि हे विलास !

आप्तांकडून किति दुर्वच बोलवीतें
मित्रांकडून असहायचि टाकवीतें
मृत्यूहि भासवि बरा कितिदां मनास
दारिद्र्य नित्य जगतीं करि हे विलास !

१९१५.

## मी कोण ?

[ चाल—भूपती खरें तें.]

लालसा व्यर्थ तव मला करीं धरण्याची
मी निराकार परि अयुक्त उपमा प्रभुची !
रविकिरण वायु यांहुनी तीव्र गति माझी
मजपुढें कथा मग काय होय विहगाची !
गिरिशिखर, मेघ, नभ, तारागण यां सकलां
भेटून यावया निमिष होय बहु मजला !
प्रतिबंध मला नच कुठें कशाचा तिळही
स्थल अगम्य मज या विश्वामाजी नाहीं !
मी स्वतंत्र परि मज कुणी बळें नमवीती
त्यांपुढें न चाले स्वैर चपल मम वृत्ती !
शिशुपरी प्रथम मज योग्य सुपथ जो दावी
मी कृतज्ञतेनें दुःख तयाचें नुरवीं !
तव आप्त—इष्ट यांहुनी निकट मी वसतों
लाडका सुताहुनि मातेचा मी असतों !
मी तुझें ज्ञान बल तेज कीर्ति सद्गूण
ओळखा बघूं मग असा असें मी कोण !

१९१९.

# खुळें प्रेम.

[ अंजनीगीत. ]

नयनमनोहर ज्याची दीप्ती
अखिल जगाची ज्यावर प्रीती
त्या कनका नच, आयस ओढी
चुंबक–प्रेम खुळें!
सकल विश्व निज तेजें कोंडी
दिनकर त्याची सरी न थोडी
परंतु दीपावरी घे उडी
पतंग–प्रेम खुळें!
तेजोराशी विशाल गोळे
गणना त्यांची गिरा न बोले
एक चंद्र परि पाहुनि उसळे
सागर–प्रेम खुळें!
माहेरचि जें उच्चगिरीपद
वास जेथिंचा अखंड सौख्यद
सोडुनि त्यातें वाहे धडधड
सरिता–प्रेम खुळें!
गोड विमल जल तुडुंब भरलें
कासारांचे असंख्य मेळे
असुनि घनास्तव तृषार्त ठेले
चातक–प्रेम खुळें!
सत्त्व ज्यामधें नसे अल्पही
अनुभव ज्याचा सौख्यद नाहीं
असें कसें जग गिरवित जाई
पुराण–प्रेम खुळें!

जानेवारी १९१६.

# दयाघन गौतम.

[ आर्या. ]

मुनिमानसशांतीतें पेटवुनी तत्सतीस ढकलून—
पापाचरणीं, गेला छिद्रमया तनुस इंद्र घेऊन.
तेव्हां पडली होती दीन अहल्या धरेवरी हाय!
मत्तेभपीडनावश नलिनीपरि विकल जाहला काय.
परमोग्रनेत्र गौतम मध्यान्हींचा जणों रवी तळपे
अश्रुजलें सिंचित तद्हृदयाचे करि असंख्यसे कळपे.
तो क्रोधाविष्ट मुनी क्रौर्यें तिजला पुनःपुन्हां पाहे
ताडी स्वशीर्ष हस्तें, सोडी उच्छ्वास भाजण्या दाहें.
हृत्संचित करुणेचा न पडावा शब्द एक बाहेर
दृष्टी वृष्टि करो बहु कोपाची म्हणुनि चाविला अधर.
वडवाग्नि जाळितांही मर्यादा लंघितो न तो उदधी
तैसा, अपराधी ती घोर तरी टाकुनी न जाय सुधी.
बघतां रक्तनयन पति ती दीनमुखी अधोमुखी होई
प्रार्थी मनिं 'नेत्राग्ने, स्वाहा मी सिद्ध सत्वरीं घेई.'
जावें चरणापाशीं दावावें हृदय सर्व उकलून
बोलावें उचलावें प्रेमानें शुद्ध हृदय तोलून.
हृदयपयोनिधि तीचा घुसळुनि त्यावरि तरंग हे येती
नवनीतापरि मुनितें क्रुद्ध बघुनि ते क्षणांत पाझरती.
दयिता असुनी क्षमिता व्हायाची युक्ति तीस नच सुचली
आशाविनाशपवनें कदलीसम ती धरेवरी पडली!
निद्रित असतां जैसा डंखावा सर्प तीव्रविषवदन
तैसें झालें मूर्च्छित असतां मुनि शाप दे कठोरमन.
"मच्छापें जार तुझा सहस्रभगकाय होय सुरपाल
तूंही शिळा बनूनी राहें विपिनीं अनल्प चिरकाल."

वाक्तूणीरांतुनि हा शापशर न जों सुटेच तों चरणीं
पडली भीत अहल्या जैशी व्याधासमीप मृदु हरिणी.
हस्तें चरण धरोनी बहु दीनत्वें मुखाकडे पाहे
फिरवी वदन मुनीश्वर नच पाहे स्तंभसा उभा राहे.
किंचित्कालें कंपित तनुसम कंपित रवें सती बाहे
'भो स्वामिन् प्राणपते, कारुण्यें एकवार मज पाहें.
तुमची दयिता जरि मी आहें तरि ती नव्हे असेंच म्हणा
माना व्यसनार्ता मज अबला वच आयका धरा करुणा.
होत्यें जडा शिला वा जळत्येंही नेत्रवन्हिच्या दाहें
परि निरखावें माझें शुद्ध हृदय एकदां दयालो, हें.
शस्त्रातें वज्रातें शंपेतें आपुल्या प्रहारें जें
देई मृदुत्व ऐसें निजदूषण जाणते सती न दुजें.
म्हणुनी वदत्यें आर्या, सुरपतिकापट्य ना कळून अशी
पडल्यें तमांत, रविसम शुद्ध करा तो करी धरेस जशी.
मी कवणाची दुहिता, दयिता कोण्या पवित्र चरणाची
परि गांजितां अशी कशि वृष्टी नच होय त्या दयाब्दांची!'
ऐसें वदून पडली भूवरि भूविण तिला न आधार
कोपानल शमवाया नयनाश्रूंची पुन्हां स्रवे धार.
कांहीं क्षणें मुनीचा कोप शमुनि अश्रु पातले नयनीं
प्रेमाचा विजय सदा होतो हें दृश्य होय सर्वजनीं.
स्वकरें उठवून सती देई स्कंधीं तिला सुखविराम
बोले "अयुतां वरुषीं होइल अजपौत्र विष्णु श्रीराम
पुनरपि भेटेन तुला जेव्हां तो राम येथ येईल
निजपादरजें तुजला तूं स्मरणें सकल विश्व तारशिल."
उच्छापवचघनरवें तप्त धरेसम सती मनीं धाली
तोंच शिला होउनि परि अहह! जवें दुर्दिनामधें गेली!

मे १९१६.

## एक गोड पापा.

[ दिंडी.]

‘ नको ताईसारखी बाहुली ती
दिसे गोली पण आंत सत्व माती
खेळ बाहुलिचा खेळतसे त्याला
भला म्हणती बांगड्या बायक्याला.’
“ बरें आणिन मी तूजला घड्याळ
खिशामध्यें ठेव तूं सर्वकाळ ”
‘ नको खोटें तें वाजणाल नाहीं
वेळ शाळेची सांगणाल नाहीं ’
“ आवडे का अलगूज तुला बोल ”
‘ नको त्याला भोंसकीं दोन चाल
मला नाहीं तें बाजवितां येत
भाउनाना सारखे मागतात.
मीच येतों कीं तुम्हा बलोबल
दाखवीतों जें मला आवलेल ’
हंसुनि बोले “ बाहेर तुला नेला
तरी देशिल तूं काय रे अम्हाला ?”
“ ताइ कांहीं बाहेर येत नाहीं
म्हणाली ती बाहुली मला देई
जरी तुजला बाहेर अम्हीं न्यावें
तरी आम्हाला कांहिंतरी द्यावें ”

अजुन आहें मी धाकटाच बाळ
मला नाहीं हापीस कीं पगाल
तळी देइन मग कांहिंतली छान
चला येऊं पोशाख मी करून!'
"काय देशिल तें प्रथम अम्हां देई
थाप देउन मग फसवशील पाहीं"
'मला नाहीं माहीत कशा थापा
बरें आधीं घ्या एक गोड पापा!'

मे १९१६.

# फूल कुस्करलें तरी—

[ पद. ]

कुस्करलें फूल तरी मारुं नको ताइ याजला
मेलें तें फूल काय। त्यासाठीं करिसि घाय
कुसुमाहुनि मृदुल काय। बाळ आपुला
पुष्पाची रुचिर लालि। बाळाच्या वसत गालिं
धरितां तूं मावळली। सोड त्याजला
भ्रमर जेंविं मधु रसास। सेवि धरुनि लालसेस
तेंविं मधुर चुंबनरस। सेवुं दे मला
सुमन पत्रनलहरीला। प्रिय जेंवीं खेळाला
तेंवीं हा बाळ मला। सोड त्याजला
फुलणारें फूल जसें। हंसणारें बाळ तसें
दुखवुं नको त्यास असें। विनवित्यें तुला
फुललेलें सुम चुरलें। पाहुनि मन हळहळलें
रडवें मुख करित खुळें। अधिक हें मला
गलित—अंग कुसुम तरी। केवळ मन व्यथित करी
परि ही गे अश्रुसरी। रडविते मला
उद्यानें बहुत भरलिं। पुष्पांनीं फुलुनि वेलिं
बाळाहुनि तीं न वहिलिं। वाटती मला
हें अभिनव बाल-कुसुम। चारुगात्र मृदुल परम
दिव्य स्वानंदधाम। सोड दे मला
बोलुनि हें ताईला। ती घेई बाळाला
प्रेमानें चुंबियला। बाळ हांसला.

मे १९१६.

## कुणासाठीं ?

[ चाल–चंद्रकांत राजाची कन्या.]

'न कळत येउनि अशी एकटी पुष्पें मिळवोनी
कुणासाठिं हा हार गुंफिसी एकांतीं बसुनी ?'
प्रश्नहेतु जाणुनी सखीचा स्मित करुनी गालीं
प्रेमी बाला विनोदवचनें निजसखितें वदली—
"अहा ग चतुरे, अपरंपारच अपुली चतुराई
कुणासाठिं हा प्रश्न करोनी दावियली बाई !
कळला मजला लाजविण्याचा हेतु तुझा कळला
परी समज मी नसे लाजरी खरें वदायाला.
'कुणासाठिं'नें माझें नच गे तुझेंच होय हंसें
आतांतरि हें सोड डोळसे लटकें अंधपिसें.
पहा पहा, ही रक्तकपोला उषा उदयद्वारीं
उत्सुकतेनें उभी जरि तिला हंसति दिशा चारी.
अहा ! दरवळे सुगंध त्याची घालुनिया भूल
कुणा गुंगवी नलिनी तिजला कवणाचें खूळ ?
अशीच रजनी दीप उजाळुनि करिं घेई अरती
सांग कुणाला ओवाळाया असते उत्सुक ती ?
शिवचापाचा पण लावुनि मग जनकाची बाळी
सांग पुढें ती कां गे अंतरिं अति विव्हल झाली ?
सांग लागलें वेड कुणाचें यांना अनिवार ?
असेन मीही तशीच वेडी जरि गुंफी हार !"
'वेडि शाहणी कुणासारखी नकोत या गोष्टी
हेंच एक मज सांग गुंफिला हार कुणासाठीं ?'

मे १९१६.

# चित्त शुद्ध करशील तर–

[ चाल–बिकट वाट वहिवाट.]

उषा उपरती सुविचार रवी प्रभात मंगल होईल
दुष्टभाव हे हिंस्र दडोनी सदिष्टसुमनें फुलतील
विकसित होइल हृदयकमल तव प्रेमरसानें भरलेलें
लोकभृंग मग धावत येतिल वचनसुगंधें भुललेले
सुटेल पावनतेचा वारा सकल किल्मिषें घनापरी
उडोनि जातिल दूर दूर मग यशोरवी तळपेल शिरीं
भीतिनिराशाचिंता–सुसरी छळिती ज्या तुज परोपरी
भवांबुधींतुनि सुटोनि जाया आशेची गवसेल तरी
उद्योगाचीं वल्हीं लावितां नौका मग ती चालेल
कीर्तिपुरीला कल्पतरूच्या छायेखालीं लागेल
आनंदामृतपान कराया मिळेल येथें महीवरी
अजरामर उत्साह तुझा तो अजिंक्य जिंकिल सर्वपरी
असा परिस तव हातीं येइल शत्रू करशिल मित्र क्षणीं
विश्वाचा विश्वास लाभुनी खराखुरा होशील धनी
परमेशाचीं अनंत रूपें जिकडेतिकडे महीवर
पाहशील तूं सदैव अपुलें चित्त शुद्ध करशील तर–

मे १९१६.

# तारागणाकडे पाहून.

[ आर्या. ]

तारे कीं कमलें हीं ज्यांहीं हें गगन सर्व फुललेलें
कमलाताई अपुली शोधित विधुकरहि ज्यांत हे आले.
कीं हा क्षतांकिततनू वीर शशी विजय पावुनी येई
त्यातें ओवाळाया रजनी हे दीप घेउनी जाई.
कीं रत्नाकरनंदन अपुलें बहुमोल रत्नभांडार
हें उघडून विनवितो 'कवणांचा तुज करूं प्रिये हार?'
कीं अंबरांगणीं या स्वच्छंदें विहरतीं सुखें बाळें
ज्योत्स्नास्तन्य पिऊनी ज्यांचें हें मुख प्रफुल्लसें दिसलें.
कीं पश्चिमावधूनें फेंकियले आपुले अलंकार
वदनीं पांडुरता ही विरहाची पसरली तिच्या घोर.
—कीं हे कंदुक अवघव! कोण तरी खेळतो असा स्वैर!
त्याला—या खेळाला माझा सादर सदा नमस्कार!

पुणे १९१६.

# श्रीशारदेस.

[ शार्दूलविक्रीडित. ]

जाड्यातें हरितें जसें निवटितें पापास गंगाजल
होतें स्पष्ट जगन्निगूढ किरणें वस्तू जशी सोज्ज्वल
जें चित्तांतिल क्षुद्रभाव हरुनी मांगल्य विस्तारितें
तें विज्ञान पवित्र जी भगवती आम्हांप्रती अर्पिते—
ती देवी सुरवंदिता विबुधवाक्पुष्पार्चिता चित्कला
ज्ञानानंद—विवर्धिनी भजकहृत्संमोहिनी मंगला
सत्काव्यें कुसुमें समर्पुनि कवी आराधिती सर्वदा
सद्भावें नमितों कृपोत्सुक मनें ती कामदा शारदा.
वेडें बालक दावि खेळ करुनी मातेप्रती कौतुकें
मातेवीण कुणी न कौतुक करी कैसें तया ठाउकें?
माझीं काव्यसुमें विदग्धसुजनां द्याया जरी मी भितों
माते, तीं परि मी तुझ्या सविनयें मोदें पदीं वाहितों.
या माझ्या सुमनांस वास अगदीं थोडा असे वा नसे
कैशीं तीं तुज रोचतील असली शंका मनीं येतसे
वेडा खेळ बघून आत्मशिशुचा माता मुका घेतसे
होतो आठव हा विकंपित मना तो धीर त्या देतसे.

नोव्हेंबर १९१६.

# प्रीति आणि नदी.

[ चाल–भूपती खरें तें० ]

प्रीतीस भीति नच अखंड गति तिज आहे
दुर्लंघ्य भयद गिरि लंघुनि सरिता वाहे.
प्राप्तीस प्रीतिच्या सदा भुकेलें विश्व
सागराकडे घे उत्सुक सरिता धाव.
अंशहीं प्रीतिचा सकलां बहु सुख देतो
वाहत्या नदीनें तत्तट शोभुनि जातो.
हृदयाची वदती प्रीती देवता
सरिता तर या भूवरची देवता
लोपतें द्वैध प्रीतीनें हृदयें जुळतां
सागरीं या नदी कुठें दिसेना आतां !

डिसेंबर १९१६.

# सविता, समीर आणि सरिता.

[ वसंततिलका. ]

शोभा नवी प्रतिदिनीं विलसे उषेची
स्फूर्ती खगास नव नित्यहि गायनाची
घेई सदा उदयवंदन या जगाचें
यांतें निमित्त रवि कीं किरणें तयाचें?

पुष्पें वनीं असुनि गंध जनांस देतो
संगीत मंजुळ मनोहर ऐकवीतो
ग्रीष्मार्कताप पळवी वळवी पयोदा
तो धन्य सौख्यद समीर सदा वहाता!

घेई जरी मलिनता उदरीं तरीही
पावित्र्य निर्मलपणा उदकांत राही
हें केवढें अतुल भाग्य पहा नदीचें
लाभे तिला सुफल नित्यगतीतपाचें!

वारा नदी रवि तिघें प्रिय आपणांला
दुःखीं सुखीं सतत ते निज संगतीला
त्यांपासुनी विहित बोध असाच घ्यावा
आलस्यमुक्त नित उद्यम आचरावा.

डिसेंबर १९१६.

# खरा थोर एकटा देव.

[शार्दूलविक्रीडित.]

सारेही जलवाह तुंगशिखरीं आकर्षुनी पर्वत
देतो नीर किती पहा उगम घे जी वाहिनी तीप्रत
त्यायोगें बहु कोप येउनि तिनें खालीं उडी टाकिली
धो धो शब्द करीत काय जणुं ती धिक्कारुनी चालली!

पूर्णेंदु प्रमुदें नभीं दिनकरा भेटावया धावतो
जों जों सन्निध जाइ तों विकलता तेजोहरा पावतो
अंतीं भानुसमीप होइ तंव हा! अस्तित्वही लोपतें
तेजोमत्तरविप्रताप अवघा हा भोंवतो इंदुतें.

संक्रुद्धा तटिनीस अन्य तटिनी ओढे पुढें भेटती
सर्वस्वार्पण ते तिला करिति तों होई किती शांत ती
जों जों दूर शशांक हो तसतसा साऱ्या कळा लाभतो
तारे सर्व मिळून भोंवतिं मधें राजा जसा शोभतो.

मोठे जे गमती दुरून असती ते क्षुद्रवृत्ती किती
अन्यांना बहु हीन मानुनि कसे उन्मत्त अव्हेरिती
जे साधारण तेच थोर असती अन्यास संमानिती
ऐसा आशय पाहुनी लिखित हें घेवो जनांची मती.

सारेही सम ज्यास मानसिं नसे ज्याच्या मुळीं भिन्नता
ऐसा थोर खरा दयाळु विभु तो विश्वामधें एकटा!

जानेवारी १९१७.

## आईसाठीं आणलेलें फूल.

[ दिंडी. ]

गिरीमागुनि पाहुनी तारकांला
कौतुकानें जों भानु नभीं आला
तोंच बालकही ये वनीं सलील
जिथें सुमनें मृदु काम्य सुरभि फुल्ल.

नभीं येतां रवि तारका न राही
बाळ आला परि विरहती फुलें हीं
कसें प्रखराशीं मृदुल तें रमावें
कोमलातें प्रिय कोमल तें व्हावें!

सहज कांट्यांतिल सुमन कुठें पाही
तया तत्कालीं खुडुनि करीं घेई
म्हणे नाजुक हें किती अहा! आई!
देव यातें कांट्यांत कसें ठेवी!

बघुनि पानाखालतीं दुजें फूल
काळजीनें अवलोकि सर्व वेल
स्वतांवरती घेऊन हार वार
फुलांसंगें खेळला लपंडाव.

शिरीं लतिकेच्या बघुनि एक फूल
म्हणे लागुनि हें ऊन हें सुकेल
नको कुसुमा तूं लपुनि असा राहीं
तुझी पानांची सावलीच आई!

श्रवणिं ठेवुनि नव पुष्प छानदार
करी स्वच्छंदें उपवनीं विहार
विहरतांना तोडून फूल एक
बाळ माघारा परतला सवेग

परी करिचें सुम जपुनि ठेवियेलें
नाहिं त्यानें वर करुनि हुंगियेलें
नाहिं चुरिलें पाडिलें पथें येतां
कशासाठीं तो असें जपत होता?

पडे दारीं पाऊल तोंच ऐका
आइ आई मारितो गोड हांका
शोध करितां धुंडुनी सदन सर्व
धाव घेई पारसितां शब्द 'धाव'.

'रामराया धाव' हें गोड गाणें
गात आई तुळशिशीं असें जाणे
येइ तेथें हळु पद न वाजवीलें
जननिनयनींचे अश्रु देखियेले.

अशीं गाणीं बसुनिया नित्य येथें
माय अपुली सुस्वरें नित्य गाते
तदा अश्रुसरी नयनिं तिच्या येते
असें त्यातें ठाउकें पुरें होतें.

गीत आईचें म्हणुनि जसें झालें
अश्रु पदरानें पुसुनि जसे गेले

तसा निकटीं येऊन बाळ बोले
'तुला आई मीं फूल आणियेलें'
'किती सुंदर टवटावित पहा आहे
घाल अपुल्या डोक्यांत आज तूं हें
तूंच घालित नाहींस कां कधींही?
माधवाची घालिते रोज आई!'
सहज ऐकुनि उद्गार बालकाचे
पाणि झालें त्या मातृमानसाचें
कंठ दाटुनि तन्नयन भरुनि आले
तदा अवघड बहु बालकास झालें!
विगत सौख्याचें स्मरण तिला झालें
अधिक तों तों तद्हृदय भरुनि आलें
वदलि नाहीं परि एकही वचासी
मात्र धरिलें लाडक्या निज उराशीं!

[ वसंततिलका.]

वैधव्य काय? सतिचें व्रत तेंहि काय?
हें अज्ञ अर्भक तयास विदीत काय?
बाळून मातृगळिं हस्त बघून तीतें
आलें भरून करुणाजल लोचनांतें.

२० मे १९१७.

# एक जुनी व नवी गोष्ट.

[चाल—फुलें वेलीचीं०]

गोष्ट वाचियली पांडवप्रतापामधली
अश्वत्थामा लहान असतां
गरीब प्रेमळ त्याची माता
पीठ कालवुनि पाणी देतां
म्हणे रे बाळा घे दूध तुला प्यायाला !

गोष्ट अशी ही वाचुनि झाली
पुढें परंतू गती कुंठली
न कळे झाली जादू कसली
वाचितां बाळ गहिंवरला तो तत्काळ !

कोमल हृदयें हालविणारी
नेत्रांतुनि जल वाहविणारी
भरती प्रीतीला देणारी
गोष्ट ही असली बाळास खास त्या कळली !

तत्क्षणिं बाळें उठून कंठीं
निज मातेच्या देऊन मिठी
वदनीं तीच्या ठेवुनि दृष्टी
म्हटलें तीतें 'सांग हें कसें मज माते ?

अश्वत्थाम्याची जशि आई,
गरीब तशि तूं माझी आई

तसें दूध पण प्यालों नाहीं
कां गे आई मज तसें दिलें त्वां नाहीं?'
प्रश्न असा हा निज बाळाचा
अंकुर केवळ कोमलतेचा
प्रेमळ हृदयीं उद्भव त्याचा
जाणुनी माय धरि कवळुनि हृदयीं हृदय!
'हा! हा! आई' बाळ बोलला
'मजसाठिं किती त्रास सोशिला
शीण कसा पण नाहिं वाटला
तुजला कधिंही सांग हें कसें मज आई!
माझ्यासाठीं सारें केलें
सुख तें सारें मजला दिधलें
नाहीं कधिंही स्वतां घेतलें
काय हें केलें आइ मीं दुःख तुज दिधलें!'
नये दाबतां असा उमाळा
ऐकुनि हे वच हृदयीं आला
कसातरि तिनें परि आवरला
धरुनी हनुला "बोलली नाहिं रे बाळा
दुःख नाहिं तूं कधींच दिधलें
दिलेंस तूं सुख मीं अनुभविलें
केले कष्टहि सारे हरिले
बाळा सारे लाडक्या सर्वदा तूं रे!"

'काय सांग मीं असें तुज दिलें ?
जेणें तुजला बहु सुख झालें'
शब्द असे जंव बालक बोले
तेव्हां आई प्रेमानें चुंबन घेई !

[ वसंततिलका. ]

जीवास कष्ट तनयास्तव माय घेई
संतोष एक मुखचुंबन तीस देई !
आहे असें नवल अन्य जगांत मोठें
आई तिचा तनय यांविण काय कोठें ?

जून १९१७.

# माळ फुलांची; पण वास—?

[चाल—मुळामुठेच्या हिरव्या—]

सदैव ताज्या यशःसुमांची गुंफोनी अभिनव माला
सेनेनें अर्पिली मोहुनी वीरवराच्या शौर्याला.
उत्साहानें कृतज्ञतेनें राष्ट्र करी जयजयकार
त्या वीराचा घरोघरींही करिती सारे सत्कार.
होता तो त्यांचाच तरीही वाटे त्यांना असें मनीं
अपुला व्हावा नातें जुळुनी; हीच लालसा वसे जनीं
मी माझें घर, मान आपुला, इनाम मम उपवर कन्या
अर्पिन याला अशा मनीषा किति कांच्या हृदयीं होत्या.
जरी यामधें पारख झाली सीमाही औदार्याची
तरी असे का आत्मसमर्पण करिती युवती सर त्याची?

* * *

सरदारानें बहुमानानें घरीं पाहुणा हा नेला
अर्पावी निज कन्या यातें हेतु असा हृदयीं धरिला
प्रेमाचा सन्मान तेथला त्या वीराचें मन रमलें
ध्यानीं नाहीं मनींहि नाहीं असें परी अवचित घडलें
बकुलसुमांची सुकली माला ती त्याच्या हातीं होती
तिचा घेउनी वास कवळुनी हृदयीं बसला एकांतीं
स्वगत वदे तो "अहा! मालिके! चतुर तुझी ती सखी किती
आणि तूं तरी वियोगिनीची दर्शनदात्री चतुर किती!"

भान हरपलें, कान विसरले ऐकायाचें, नवल नसे
परंतु रुमझुमणारे नूपुर क्षणांत झाले मूक कसे?
"काय करीं तें?–तें का हृदयीं? अस्फुट तें वदनीं काय?"
बघतां बघतां आणि ऐकतां मोहिनीच मोहुनि जाय.
एकाएकीं युवकानें मग सुंदरीस त्या देखियलें
तिनेंहि केला प्रश्न-'काय तें?'–"माल्य असें वासें भरलें"
'सुकलेली ना माला ती मग जवळ कशाला बाळगिली?
–आणि काय ती अजून आहे सौगंधानें भरलेली?'
खोंचदार हे प्रश्न तिचे तरि सहज बोलला तो "होय"
होय बोलुनी सोय न धरली मृदु हृदया लागे हाय.
त्या चतुरेला सर्व समजलें आणि उमजलें तरीपण
मनीं म्हणाली–'सुहृद करावे दीन हाहि का वीरपण?'

* * *

प्रणयवतीच्या चतुराईनें प्रसंग टळला दुस्तर तो
परंतु वारिल कोण कसा जो चतुर विधाता पाठवितो!
प्रेमानें जी वेडी झाली उन्मादानें बेहोष
प्रणयवतीनें अशा टाकिले त्यावरि अनिवाराचि पाश!
पुष्पहार ती एकाएकीं मोहुनिया कंठीं घाली
येतां भानीं रणधीराच्या वृत्तीची गडबड झाली!
कांहिं सुचेना निःस्तब्धपणें उभा ठाकला चित्र जसें
करपाशहि ती टाकणार तों तिला बोलला 'थांब' असें.
"थांब सुंदरी, या हारांतिल पुष्पांना नाहीं वास
येत जयाला, त्यावरि अपुला टाकिसि कां हा करपाश!

वास येतसे मला फुलांचा जिनें वेंचिलीं फुलें तर
त्या दयितेनें—प्राणप्रियेनें दिधला मजला हा हार.
हा जरि सुकला तरी न मुकला वासाला अद्यापि असा
तुझिया ताज्या हारासम गे म्हणुनी घे हा परत कसा!"
प्रकार झाले असे त्यांमधें वीरचि तो झाला विजयी
जशी रणीं समशेर तशी ती माला हें यश त्या देई!

* * *

नगरामध्यें स्वागतामधें चित्त तयाचें नच रमलें
उत्कंठेनें वियोगिनीच्या खेड्याला घेउनि गेलें!
ज्या बकुळीच्या पुष्पांची ती माळ तिनें केली होती
त्या बकुळीच्या झाडाखालीं चिंतित ती बसली होती!
'जिवलग माझा विजयी झाला करिती सारे सन्मान
दंग त्यांमधें तो झाला कीं असेल त्याला मम भान!
पवित्र या सुमनांची—माझ्या प्रेमाची दिधली माला
असेल का ती जवळ तयाच्या ठाउक रे देवा तुजला!'
तोंच मागुनी शब्द निघाले "हीच काय ती तव माला?"
माळ घेउनी—

क्षणार्धांत ती निजकंठीं माला गेली
—आणि दुजी करकमलाची ती दयिताच्या कंठीं पडली!

* * *

धन्य धन्य तीं! त्या माळेला वास कशाचा सांगावा—
सर्वांनीं मोदानें इतुका हेतु मनीं मीं ठेवावा!

१० जुलै १९१७.

# देवा.

[ शार्दूलविक्रीडित.]

दासी होउनि राबते तव गृहीं लक्ष्मी सदा **श्रीधरा**
तीचा किंकर मी कृपेस मुकला लाभेल का आसरा?
जो सर्वांतक काल त्यावरि तुझी सत्ता **अनंता** चले
त्याचें भक्ष्यच मी कुठें प्रभु कुठें तूं स्वांत हें उन्मळे!

आहें इंद्रियदीन मी तव **हृषीकेश** प्रसिद्धी अशी
मी तों अंध मलाच जाणत नसे तूं **सर्वसाक्षी वशी**
व्हावी प्राप्ति मला तुझी पण कशी होणार या अंतरें
ऐसें नाममहत्त्व चिंतुनि निराशेचें भरें कांपरें!

जीं नामें मजला सुदूर करिती देवा तुझ्यापासुनी
तीं केव्हांहि मला नकोत परि तूं व्हावास यालागुनी
हा मी व्याकुल दीन भावुक तुला चित्तीं असा जाणतों
**दीनानाथ दयाळ वत्सल** तसें प्रेमें सदा बाहतों.

१० नोवेंबर १९१७.

# अश्रूंचा पाऊस.

[ साकी ]

बाळ लाडकें सान बसावें अपुल्या तातापाशीं
तसें एक खेडें बसलेलें आहे सह्यगिरीशीं,
रहात होता तेथें कुणबी भला देवजीराव
लहानशा त्या गांवीं त्याचें होतें मोठें नांव !
सांभाळी दारिद्र्य तयाचें सुख चोर जशी ठेव
कधीं कुणाला कळला पुढला निज दैवाचा डाव !
सगुणा त्याची घरधनीण ती शोभविणारी नांव
संसार करी जपुनी खपुनी वाखाणी गुण गांव.
त्या उभयांची स्वानुरूपता जणुं छाया घनदाट
दों बाजूंनीं करी सुखाची संसाराची वाट !
नक्षत्रपथीं नक्षत्र जसें भेटावें चंद्राला
मूर्तिमंत सुख तसें भेटलें त्या मार्गीं दोघांला !

* * *

त्या सौख्याला—त्या बाळाला—त्या त्यांच्या दौलतिला
सात पावसाळे होउनिया अठवा जवळी आला
तेव्हां प्रेमळ कष्टाळू त्या जीवां ऐसें वाटे
प्रहर आठवा सातांनंतर रोजचाच हा भेटे !
आगोटीचें ताण म्हणोनी करुनि जिवाचें रान
सर्व तरतुदी करिती स्मरुनी पुढें ठेवुनी ध्यान.

अंगणांत आधींच ठेविलीं तीन अळीं भाजून
बिया लाविल्या मुहूर्त बरवा आखितिचा पाहून.
कडेकडेचीं अळीं लाविलीं सगुणेनें—देवजिनें
उरलें मधलें अळें लाविलें बाळाच्या हातानें.
—पुढें जगाचा पोशिंदा कीं कनवाळू दीनांचा
पवनखगावर बसून सोडुनि सन्निवास अब्धीचा
आकाशांतुनि अनंतरूपें अवतरला भूवरती
तन्मयतेची साक्ष द्यावया सजली सारी सृष्टी !

* * *

हाय ! परंतू महामारिचा रोग भयंकर आला
लहानशा त्या गांवीं तेणें अनर्थ मोठा केला !
कृतांत निर्घृण नको न्यावया तें तें घेउनि गेला
त्यांत तयांचा तो एकुलता एक बाळही नेला ! !

* * *

हिरव्या शेतीं हिरव्या रानीं हिरव्या डोंगरभागीं
वीज पडोनी सुकला ऐसा एकच वृक्ष अभागी !
तसाच तेथें दुजा अभागी होय देवजीराव !
दुर्दैवानें डाव साधला असा घालुनी घाव !
प्रघातघाता जसा झेलितो झिजतांहि पाषाण
दुःख तसें तें झुरुनि साहिलें निज मन केलें कठिण !
नशिबीं जें होणें तें झालें उरलें लौकर—छे—छे—
होणें तेव्हां होवो नाहीं अधीर मन हें माझें !

असें देवजी वदुनि सदाही देवाला दैवाला
कठोरतेच्या आनंदें हा! कंठी आयुष्याला!

* * *

एके दिवशीं अंगणामधें विळा करीं घेऊनी
काम कायसें करितां फिरली दृष्टी आळ्यांवरुनी
तेव्हां मधलें अळें वाढतें जोरानें त्यावरती
फुलेंहि आलीं असतीं फारच असें देखिलें आणि—
—आणि एकदम विळा घातला त्यावर आवेगानें
तों हृदयावर घाव बैसला तसाच किंकाळीनें!
'काय काय हें केलेंत अहो' वेगें धांवत आली
ती अश्रूंचा पाउस पाडित आळ्यापाशीं बसली!
अश्रु गळाले—त्यांत मिळाले, भान हरपुनी गेलें
मात्र बोलला—'हें काय तुवां वेडे, आरंभियलें?"
'गे अश्रूंचा पाऊस जरी तुवां इथें पाडियला
त्याच्या ओलाव्यानें अंकुर फुटेल का गे याला?
फुटला अंकुर तरी—उमललीं फुलें—तरी काय?
फळें बाजलीं तरी—आपणां करावयाचीं काय?"

* * *

ज्या जीवानें आवेगानें असा तोडिला वेल
ज्या जीवानें आक्रोशानें हालविला भूगोल
त्या जीवांचे बंध तोडिले-तुटलेले—मग कोणीं!
अश्रूंचा पाऊस तेधवां पाडी सारी धरणी!!

१० फेब्रुवारी १९१८.

# पैसाफंडाचे श्लोक

[ भुजंगप्रयात ]

स्वदेशीय उद्योगधंदे बुडाले
कलाभिज्ञ सारे उपाशी निमाले
जगावे कसे ते ? तरावे कसे ते ?
तुम्हांवांचुनी कोण तारील त्यांतें ?
नभीं ग्रासितो राहु चंद्रास जैसा
असे आपला देशही ग्रस्त तैसा !
करा एक पैसातरी दान त्याचें
अशा वेळिं आहे बहू पुण्य साचें !
बघोनी नभीं वाढता चंद्र त्यासी
दशी वाहतां इच्छुनी लाभ जैशी
समुत्कर्षगामी स्वदेशास तैसा
हितेच्छू तुम्हीं अर्पिणें एक पैसा.
असे तीर्थसा देश तुम्हां स्वकीय
तदुत्कर्षवांच्छा सुवेला अलभ्य
उपाध्याय सद्भाव संकल्प केला
करा दान तें या स्वयंसेवकाला.
जसा मंदिरीं पाडिते सुप्रकाश
तसा अंतरीं प्रेरिते जी स्वदेश
अशी दिव्य ती कांच पैदा कराया
करा शक्य साहाय्य तें सेवका या.

परप्राप्त सौभाग्यचिन्हें स्त्रियांनीं
धरावीं करीं गोष्ट लाजीरवाणी !
स्वदेशांत व्हावीं स्वधर्मीय कार्यें
करा शक्य तें साह्य नाना उपायें !
स्वदेशांतलें पूर्वजें बांधिलेलें
पहा उन्नतीधाम भंगून गेलें
नको काय उद्धार त्याचा कराया?
करा शक्य तें साह्य या पुण्यकार्या.
क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे
समर्थांचि हे वाणि जीवंत पाहे
जयश्री नसे बोलक्या वासनेला
मुक्या थोडक्या लाधते जी कृतीला !

अक्षय्यतृतीया शके १८४०

# ७।८ वर्षांच्या एका बालिकेस पाहून.

[ दिंडी ]

कुठेंतरि मीं बालिका पाहिलेली
स्मृतीपाशीं खेळून राहिलेली
तिच्या खेळाचे मुके मधुर नाद
असति त्याचे पडसाद दोन शब्द.
'सहज–सुंदर' हा स्पष्ट घोष त्यांचा
विकृत नादांचा नवलपूर्ण साचा
हृदय माझें घुमवून सर्व टाकी
प्रतिध्वनिचा स्पष्ट मी असें शोकी!
तीच बाला बाहेर सहज आली
सहज पाहूं लागली उभी ठेली
सहज वदली हांसली सहज गेली
सहजतेची वीज ती लुप्त झाली!
वृत्ति कृत्रिम मृत दुष्ट जगाच्या ज्या
अनवगत त्या अगदींच तिला होत्या
सहज भाषण कटु तिला कुणीं केलें
सहज तीच्या नयनांत अश्रु आले!
सहज तीच्या नयनांत अश्रु येती
शुद्ध गंगा सहजता उद्भवे ती
सहज कोणी परिपूत होय तेथें
आणि मग ती सहजची गुप्त होते!

फुलें तुजला कां आवडतीं फार ?
मुलांवरतीं प्रीति कां तुझी फार ?
कसें सर्वांशीं सख्य तुझें होतें ?
सहज उत्तर हें एक तिचें येतें.
सहजतेचा संसार तिचा सारा
त्यांत कृत्रिमते नसे मुळीं थारा
स्वभावीं कीं अनुभवीं एकरूप
विकृततेचा स्पर्श ना कुठुनि लेप ?
तेज चपलेचें कुठुनि तिला आलें ?
तसें गंगापावित्र्य कुठुनि आलें ?
कुठुनि आलें ? होतेंच तिच्या ठायीं
सहजतेच्या वाहिलें सर्व पायीं !
सहजतेच्या वाहिलें सर्व पायीं
उणें सौंदर्यच कसें तिच्या ठायीं ?
नभीं रजनी जेधवां प्राप्त होई
सहज तारांहीं सुंदरता येई !
फूल वेलीवर फुलो पुन्हा दिव्य
वास येईलच सहज त्यांत रम्य !
सहजतेचें जगिं फूल कधिं फुलेल ?
ज्यांत पावन सौंदर्यही असेल !

२२ एप्रिल १९१८.

# महात्मा गांधी.

[आर्या.]

बोले तैसे अपुले सज्जन जो चालवी सदा चरण
वंदन तयास माझें पुण्यप्रद हें मला सदाचरण.
सत्याचा दीनांचा छळ पाहुनि फार कावुनी गेलों
ईश्वर निष्ठुर निजला मेला ऐसें किती कटू वदलों.
सत्य कसें जय पावे सोडी हीनत्व केंवि दीनाला
तो उज्ज्वल पथ दावुनि आरोपी ईश तूंच सोडविला.
जगिं बोलतात सगळे अरण्यरोदन कुणी न आयकितो
चंपारण्यामधलें रोदन परिसे असा जगीं तूं तो !
अन्ना महाग झाले त्यांसाठीं तूंच अन्न वर्जियलें
कारुण्य आत्मबल निज हृदयांतिल तूंच एक दाखविलें.
सत्तेपुढें न चाले शहाणपण घोकुनी सकल बसले
सत्याशीं सत्ताही नमते हें तूंच तूंच दाखविलें !
तव धन्यवाद यावज्जन्म जरी गाइले तरी किति ते
काल अनंत अखंडित गायाला लागला तयापुढते !
हतभागी भारतजन पहा पहा या महानुभावाला
वचबद्ध प्रभु तुमच्या त्राणास्तव विषमकालिं अवतरला !
त्यागी सत्यव्रत हितदक्ष सुधी धीर या महात्म्याला
नेता करा यश धरा होऊं दे चकित सर्व जगताला !

१० जून १९१८.

# सिंहगडावरची सकाळ.

[ चाल–नृपममता.]

पवन मंद शीतल सुटला
जडगिरीस जीवचि आला–तो जणूं
खगवृंद करी गानाला
जणुं मुका गिरी तो झाला–बोलका
व्यंग अतां त्याचे देहीं
आंधळेपणाचें राही–दुःसह
इतक्यांत । किरण आरक्त । वितरि दिननाथ
पूर्वबाजूनें । आंधळा दृष्टिलाभानें–शोभला
तेधवां गिरी तो चढतां
ही सकाळ असली होतां–दुर्ग तो
सामोरा मजसी आला
आदरें तदा मीं त्याला–वंदिलें
हर्षखेदमिश्रित असलें
मनिं समाधान अवतरलें–दर्शनें
तदुपरी । त्या गडावरी । स्मारकें खरीं
दर्शनें त्यांचीं । घेउनी स्पृहा हृदयाची–पुरविली
वस्तु शतावधि वर्षांच्या
शौर्याच्या आठवणीच्या–पाहिल्या
ज्या ठायीं साहस धैर्य
कीं जिवावरिल औदार्य–प्रकटलें

तीं स्थळें तयांच्या गोष्टी
हृदयाला करिती कष्टी--कितितरी

हतभाग्य। शौर्य तें धैर्य। विभूती वंद्य
स्मृतीनें त्यांचीं। हृदयावरि चित्रें साचीं–रेखिलीं

शिवराय ह्याच वेळेला
दे नाम सिंहगड याला–एक हें
पूर्वेस फुटे जों गोंडा
तों चढला भगवा झेंडा–एक हें
मातृप्रेमयज्ञीं स्वाहा
जीवाची अर्पी तान्हा–एक हें

वैखरी। बंधुची खरी। पूर्व साजिरी
तींत रणगाजी। उगवला वीर सूर्याजी—हें पुढें

उलटलें असें तें चित्र
सध्यांचें सर्व विचित्र–पाहिलें
हाय! हाय! वाणी वदली
खिन्नता मूर्त अवतरली–भोंवतीं
दुःखानें मानस भरलें
अश्रुंनीं नेत्र डबडबले–तेधवां

अंधार। घोर अनिवार। तैं सभोंवार
पसरला तुमुल। सिंहगडावरति सकाळ। असुनिही

१ आक्टोबर १९१८.

# ऐका आणि पहा.

[ दोहा ]

सोसलास जर धैर्यानें सर्व आजचा ताप
तरमग जाळिल कसा उद्यां लवही पश्चात्ताप ?
काकदृष्टिनें जग बघतां सारी घाणच घाण
पंकजांतही मधु मधुची गवसे भृंगा खाण.
फूलपांखरूं गरजेचें धरि सर्वांचा सोस
परि हा आदर-मिलिंद बा त्या कमलाचा दोस्त.
दोष जाणसी परक्याचे म्हणूं शाहणा काय ?
म्हणतों मूर्ख तुला अपुले दोष न कळती काय !
स्पर्शाया भी वैर तुझें कडक सोंवळें फार
परि अकृताच्या सुतावरी न पडो पद जप फार !
बघ हें वारुळ मुंग्यांचें शक्ति तयांची काय !
परि नागोबा पाहुनि हें दूर काढितो पाय !
तोंडें वेंगाडायाची जाईल तुझी खोड
आरशामध्ये पहात जा आधीं अपुलें तोंड.

२५ आक्टोबर १९१८.

## कांहीं अलौकिक पाहिल्यावर—

[कांहीं अलौकिक नजरेस पडलें म्हणजे जगावरचा कमी होऊं लागलेला लोभ आपोआप वाढून दृढ होतो.]

[चाल—भूपती खरें तें•]

जाहलें आजची सार्थक या जन्माचें
पारणें आजची फिटलें या नेत्रांचें.
हें उत्कंठित मन निराश कितिदां झालें
मज गमलें कीं तें प्रफुल्लतेला मुकलें.
परि नवलपरी हो क्षणांत एकाएकीं
आपलें आपणच आज सहज फुललें कीं!
वीट या जगाचा आजच विटला हटला
हट्ट या मनाचा आजच सहजीं सुटला.
बंधनें मनाचीं अपाप तुटुनी गेलीं
भूषणें यथोचित अपाप सारीं जडलीं.
दुःसह तें सहुनी जीवित कां तग धरितें?
हें असें अलौकिक दिसावयाचें असतें.
इच्छेचीं चित्रें बोलुनिचालुनि गेलीं
कल्पना दिव्य ती दिसली अवतरलेली!
आशेचा एकच तेजोमय परमाणु
हृदयांत उगवला जसा नभींचा भानु
या जगत्पटाचें मूल्य काय जें आहे
तें सर्व—सर्व या जरिकांठाचें आहे!
आपदा कष्टदा छळो सर्वदा कितिही!
एकदां दिसो हें क्षिती नसे मग लवही!

१ नोव्हेंबर १९१८.

# सीतेचें गाणें.

[ चाल–चंद्रकांत राजाची कन्या.]

रघुनाथा, ही हतभागी तव वनवासी सीता
देत असावी दोष कधीं हें आणुं नका चित्ता.
त्यजिलें न तुम्हीं प्रिया, वनीं या माझी मी आलें
उलट तुम्हाला वैभवांतही वनवासी केलें.
देवा, तुमचा जन्म सुखाचा दुःखाचा केला
अंत खरोखरि या पापिणिच्या नाहीं पापाला.
कठिण पणाचें संकट रचिलें सांपडलें त्यांत
या बुडतींचा तेव्हांपासुनि धरिला तुम्हि हात.
हट्ट धरोनी वनांत आलें त्या हट्टानें हा—
अभागिनीचा हात शेवटीं सोडविला हा हा!
दुरुत्तरांनीं निरपराध तव बंधूला छळिलें
अविचाराचा कळसचि केला दुष्टकरीं पडलें.
तुम्हीच आहां दुर्भाग्येचे कैवारी म्हणुनी
सोडविलें मज महाप्रयासें संकटाब्धि तरुनी
दुःखदायिनी साडेसाती मूर्तिमंत असुनी
सुखासनावर पुन्हां बसविली अंगिकार करुनी.
परि या फुटक्या नशिबानें तें नाहीं लाभुं दिलें
आठवली अवदशा पुन्हा मी वनवासी झालें.
पहिला तो वनवास नव्हे हा आहे वनवास
दान जानकी वनीं एकटी राम अयोध्येस.

पांघरती वल्कलें दुकूलें असुनी नशिबांत
बाळें हीं राजाचीं सीते, दे नशिबा हात!
आठवतां बोलतां मागलें भविष्यही कळतें
या सीतेपासुनी नसावें सुख रघुनाथातें.
उदार निर्मल पावन नाथा, चरित्र तव सगळें
अभागिनीनें या सीतेनें दुःखपूर्ण केलें!

४ जानेवारी १९१९.

## दीनांचा विश्वास.

[ चाल—होय संसारतरु. ]

दीन विश्वास नित ठेविती प्रभुपदीं
धीर चित्तास तो त्यांचिया आपदीं
दशदिशा रोधुनी । गगनही व्यापुनी
संकटें धांवुनी । येति त्या आपदीं
ईश गगनाहुनी । हृदयसिंहासनीं
तत्क्षणीं स्थापुनी । भावबळ जोडिती
शरिरास यातना । दुःसहा वेदना
अंतरीं भावना । घालिलचि तो उडी ॥ १ ॥

## प्रार्थना.

[ शिखरिणी. ]

कधीं सेवेमाजीं चुकुनि पडलें अंतर तरी
उपेक्षेची शंका मनिं नच धरावी क्षणभरी
जिथें प्रीती भक्ती रति परमशुद्धा निवसती
तिथें हृत्कुंजांतीं मधुर कविते! तूज वसती.

नसे या जीवाला तुजविण निवाराच जगतीं
विपत्तिज्वालांहीं सकल भवसौख्यें करपतीं
तुझें ध्यानध्यासस्मरण करितां मात्र निमिषीं
वदूं कैसें होतें सुखमय मदायुष्य मजसी!

कृपा कोणाची ती जर मज हवीशी तर तुझी
तुझी सेवा व्हावी मम मनिं मनीषा नच दुजी
निवासें चित्ताचें कुसुम करिं आमोदनिलय
दिगंतीं शब्दांहीं पसरुनि सुखा दे अतिशय!

२२ मे १९१९.

# जुना बाजार.

[ चाल—कसें मी मारूं० ]

जुना बाजार । भरला किति अपरंपार !
जुने पुराणे साधे भोळे
कृपण रिकामे पैकेवाले
जन्मदरिद्री या हो सगळे
जुना बाजार । भरलासे अपरंपार !
वस्तू येथें परोपरीच्या
बहु उपयोगी संसाराच्या
तरीहि अगदीं स्वस्ताईच्या
घाला ऊडी । दमडींत करा रे झिमडी !
नसतां मुळीं जुन्याची थोरी
नव्या वस्तुला किंमत भारी
अपुली ऐपत पतही सारी
होइल ठार । हा बरा जुना बाजार !
आला काळ कठिण अनिवार
झालों आपण बहु बेजार
तरीहि करितां खोल विचार
खरा आधार । हा एक जुना बाजार !
संसार पुरे कितीक करुनी
आल्या वस्तु पहा शुभशकुनी
त्यांची त्वरित खरेदी करुनी
नवा संसार । थाटूं या नमुनेदार !

'घेणं नास्ती देणं नास्ती'
त्यांसहि यावें हीच विनंती
अखंड गाजत राहो कीर्ती
जुना बाजार। त्यालाच गिऱ्हाइक फार!
नेमें या बाजारीं यावें
यातें कधीं न कंटाळावें
इतर जगाला सुखें हंसावें
नको तत्संग। जग झालें हो बेढंग!

२७ मे १९१९.

# पतंगाचा पोवाडा.

[चाल–काठोकांठ भरूं द्या पेला.]

प्रीतीपुढती जीव तो किती हाच जयाचा असे धडा
लहानग्या त्या वीराचा हा असे चिमुकला पोवाडा.
जिकडे तिकडे चहूंकडेही खडा पहारा तिमिराचा
वाटा चुकल्या सर्वांच्याही प्रांत मिळे नामुष्कीचा.
काय करावें कसें सुटावें जीव तळमळे तेजाचा
कांहिं रुचेना कांहिं सुचेना उपाय न चले कोणाचा.
बारा रस्ते ते दुसऱ्याचे याचे मोडिति पाय सदा
हाणिल बारा ऐसा न्यारा परभारा याचा रस्ता.
भेकड दुबळे जीवन्मृत ते हंसोत कोणी निंदोत
प्रीतीसाठीं ध्येयासाठीं प्राणहि माझे जावोत.
निश्चय झाला उजेड दिसला उडी घातली अंधारीं
आवेगानें आनंदानें गात गात चाले स्वारी.
पतंग मग तो वेडा बेटा आला अपुल्या दीपाशीं
प्रदक्षिणा गरगर भरभर त्या करी प्रज्वलित यज्ञासी
अमोघ ज्याची शक्ति लागली घोष करित त्या मंत्राचा
स्वाहा म्हणुनी हविर्भागही अर्पियला निज जीवाचा !
—सायुज्यपदीं पतंग गेला जग हें अपुलें जसें तसें
जरी बंदिवान् तरी धैर्यवान् खुशाल अपुलें त्यास हंसे.
स्वर्गवास त्या पतंगास पण जगीं तयाचा उपहास
दिव्य करुनि तो दिव्य जाहला तेज दिसेना जगतास.

भीतीपाशीं कधीं कधींही प्रीतीची मैत्री नाहीं
क्षिती जिवाची कधीं कधींही प्रीतीला वाटत नाहीं!
बहलपाचा विवेक कधिंही प्रीती नाहीं करणार
लाभालाभावरी प्रीतिचा जगांत नाहीं व्यवहार!
विचार सांगे पळावयाला प्रीति करीं दे तलवार
फकीराहुनी बेफिकीरही सर्वांहुनि तालेवार
ठेव कपाळीं हात कुणाच्या भस्म तयाचें करशील
वर हा पहिला प्रीती मिळवी भस्मासुरही मागील!
दीपपतंगा, भेकड जग हें म्हणो तुला वेडा-वेडा!
तुझ्या प्रीतिचें कौतुक जाणे तो गाई हा पोवाडा!

१६ आक्टोबर १९१९.

# तगरीचें फूल.

[ दिंडी. ]

फूल तगरीचें सर्वगुणीं साधें
दृष्टि पडतां सहज हें चित्त वेधे
रूप नखऱ्याविण रुचिर कसें पाहीं
डौल नमुनी बेडौल मुळीं नाहीं !

शुभ्रतेला शुद्धता शोभवीते
मंदतेनें मधुरता सुगंधातें
कसें साधेंपण शोभवी गुणातें
बघुनि घे हें या पाहुनी फुलातें.

पाकळी ही वांकडी गोजिरीच
नागमोडी ही कडा साजिरीच
पाकळ्या या नांदती जरी स्वैर
तरी नयनांला दिसत नसे गैर.

अहा ! डेंखावर बिंदु हा कशाचा ?
दुधाचा हा गुटकाच का मुखींचा ?
वृत्ति पाहुनि म्हणणार नाहिं कोण ?
पुष्पसृष्टीचें बाळ हें लहान !

'सुमन' असलें हें आज तुझे पायीं
भक्तिभावें शारदे, तुला वाही
भाव जेथें प्रश्न ना तिथें कांहीं
गुलाबाचा जाइचा जुईचाही !

२ जुलै १९२०.

# लांकूड व लोखंड.

[ उपजाति. ]

जळे पुढें अग्निमधें तरीही
मागें जयाला लव आंच नाहीं
लांकूड तें सारुनि बीनधोक
करून टाकील कुणाहि राख !

दया कुणाला जरि ये तयाची
घाली कुणी धार मुखीं जलाची
विझून वांचून जगीं उरून
घे काळतोंडें जळकें म्हणून !

लोखंड अग्नींत जरी पडे तें
संतप्त सर्वांग तदीय होतें
लावील तेव्हां कर कोण त्यास ?
देईल खासा चटका तयास.

जें जाळितांही असणार थंड
रक्षा तयाची ठरली उदंड
जें तापतां दुःसह डाग देतें
भिणें तयाला जगिं भाग होतें !

२५ डिसेंबर १९२०.

## अशिक्षित दारूबाजास—

[भुजंगप्रयात]

घरीं दैन्य दारिद्र्य दुःखास आणी
धनातें सुखातें दुरी घालवूनी
करी अब्रुची सर्वथा धूळदाणी
कशाला पितां दुष्ट तें 'लाल पाणी' !

उपाशी मुलें आइला चावितातीं
घरीं वाट पाहात दारीं बसे ती
भुकेलीं अशीं लाडकीं विस्मरूनी
कसें निर्दयांनो पितां लाल पाणी ?

उन्हामाजि काबाडकष्टां करावें
सुखाचे घरीं घांस जाऊन खावे
मधें दारुचा ग्लास ढोसून जाती
तयांचे मुखीं सर्वदा धूळमाती.

विटे बायकोही तुटे बंधुमित्र
सुटे गांठिचें ना फिटे कर्जमात्र
अशा रीतिनें फोडि संसारतारूं
कशी ती पितां दुष्ट चांडाळ दारू ?

मुखीं विठ्ठलाचें जरी नाम घेणें
तुकोबास कांहीं जरी मान देणें
शिवाजी महाराज तो आठवीणें
तरी दारुचा स्पर्श हें पाप जाणे.

रामनवमी शके १८४३.

# नेपोलीयनास.

[ साकी. ]

अलौकिकाचें प्रेम जयाला असेल या जगतांत
त्याचा त्याचा नेपोलीयन तुज सादर प्रणिपात.
निज देशाचें प्रेम अल्पही असेल ज्या हृदयांत
त्याचा त्याचा नेपोलीयन तुज सादर प्रणिपात.
शूर उदारा, कठोर रसिका, परिश्रमी श्रीमंता,
अरिच्या मित्रा, चतुर महात्म्या, हे विचित्र धीमंता,
सर्वविलक्षण नेपोलियना, धन्य तुझा अवतार
अनंतरंगी दुनिया केली तुवांच गारीगार!
भूमध्याची लाट युरपच्या पायीं थबकुनि गेली
परी तुवां निज पराक्रमाची डोक्यावरुनी नेली!
परके आम्ही तुला वानितों तुझ्या गुणांचेसाठीं—
शौर्यासाठीं, बुद्धीसाठीं, अलौकिकत्वासाठीं!

६ मे १९२१.

# मंजुळीचा दादा.

[ साकी. ]

दुष्काळाचे दिवस बुडाली शेतीभाती आई
सावत्रपणें करि पोटाचे हाल मजूरी 'माई'
कधीं पोटभर कधीं मूठभर कधीं चिमुटही नाहीं
चिमटाहि कधीं पोटाला परि गती न तिजविण कांहीं !
अशी अवदसा नेइल तिकडे दाखवील त्या वाटे—
गेला अर्धा-अधिक गांव तो पोटिं भराया कांटे !
उरले सुरले लोक करूनी कधीं जिवाचें रान
कधीं मजूरी करुनी करिती कशीबशी गुजराण !
त्यांत एकटी विधवा बाई—दोन मुलांची आई
हाय ! हाय ! पुष्पांसह गेली होरपळूनी जाई !

* * *

पतिनिधनाचें दुःख सर्वही मनामधें ठेवूनी
कष्ट करूनी कंठित होती दिवस मुलें पाहूनी !
बोले हृदयीं 'विठ्ठल माझा फेडिल पांग उद्यांला
सुंदर माझी पोर मंजुळी योग्य भाग्यवंताला.'
वर्षें गेलीं चार पुढें हें वर्ष पांचवें आलें
धीराचें मन तिचें मात्र तें यावेळीं घाबरलें !
'अनाथ अबला मी देवा रे लहान माझा बाळ
दीनदयाळा, तुझ्यावांचुनी कोण करिल सांभाळ !'

जेव्हां कोणी शेजारीही घर सोडून निघाले
'आपणही जावें का?' ऐसें मनीं तिच्याही आलें.
परंतु तेव्हां विचारही तो असह्य झाला तिजला
परंतु योगायोग कुणाला भोगल्याविणें सुटला!

* * *

क्षणाक्षणाला कष्ट करोनी कणाकणाला जपुनी
गेले कांहीं दिवस बरेसे पोटापुरतें मिळुनी!
'इतुकेंहि पुरे देवा कांहीं नाहिं मागणें फार'
गरिबांविषयीं जग हें कोठें इतुकेंतरी उदार!
महागाइची आग भडकली भाव कडकुनी गेले
किती करावे कष्ट तरीही पोट जळेना पुरतें!
पुन्हा कपाळीं काठी घेउनि फुटेल तिकडे वाट
त्रस्त जीव ते गेले कोठें! किती दुष्ट हें पोट!
अनाथ अबला अशा संकटीं करिल एकटी काय?
दहासहा वर्षांचीं कोमळ बाळें करतिल काय?

* * *

पुढें मुलेंही करूं लागलीं पैपैसा कष्टाचा
मेल्यापेक्षां मरून गेला जीव तदा आईचा!
धरून पोटीं निजबाळांना किती-किती ती रडली
म्हणे 'लाडक्या बाळांनों मी आई तुमची कसली'!
तदा मुलांनीं रडुनी रडुनी केला बहु आकांत
उधान भरतीची प्रीतीची उसळे उत्कट लाट!

जीवापेक्षां अधिक तयांनीं केले जरी उपाय
तरी निघेना दुष्काळाचा पोटावरचा पाय!
एके दिवशीं संध्याकाळीं तिघें उपाशीं निजलीं
पोटाची ती आग भयंकर पाण्यानें ना विझली!!

* * *

उठुनि सकाळीं आईस वदे 'जातों मी करुब्याला'
'रात्र करूं नको ये बा लौकर' म्हणे पुसुनि डोळ्यांला!
आपणही मग रानीं जाउनि लांकुडफाटें अणुनी
देउनि विनवुनि वाण्यापासुनि ये दाणे घेऊनी
भरलें होतें मंजुळिनें तों घरांत सारें पाणी
गुणी मुलें गरिबांचीं अणिती सहजीं नेत्रीं पाणी!
दळावयाला आई बसली हात तिला ती लावी
चाळण ठेवी सुकीं लांकडें आणून तिला देई
निमित्त करुनी त्यांतहि गेली पहावयास कितीदां
दुरून कोठें दिसतो येतो काय आपुला दादा.
जेव्हां आली हांक 'मंजुळे, ये भाकर खायाला'
तेव्हां बोले 'मी न एकटी येऊं दे दादाला'!

* * *

झाली संध्याकाळ देवही घरास अपुल्या गेला
तरि मंजुळिचा दादा अजुनी नाहिं घराला आला!
पुसे सारखी दारावरुनी कोणी जातां येतां
'पाहिलांत का? येतो काहो मागुनि माझा दादा?'

जो तो सांगे 'नाहिं पाहिलें दादास तुझ्या कोठें'
तों तों फाटे हृदय आणखी पूर अश्रुचा लोटे!

*          *          *

आशा गेली निघुनि पहारा करित निराशा बसली
कभिन्न काळ्या काळोखानें सृष्टी भरून गेली!
भाकरी तिथें तशीच पडली अमृताचें विष झालें
सुखशिखरापासून जीव ते दुःखसागरीं पडले!

*          *          *

ऐका, तेथें गांवामधले काय बोलती लोक
'अफाट जगतीं कुठें बिचारिस गवसेल तिचा लेक?
अबलेवरती प्रसंग देवा, कां असला आणावा?
दयाघना, तुज आम्हीं केंवीं निष्ठुर तरी म्हणावा?'
ओसाड घरामधें अजूनी वाटे जातां येतां
रडे माय ओरडे मंजुळी दादा दादा दादा!!

१० मे १९२१.

# क्षणांत उलगडा.

[ लहानांत आणि मोठ्यांत मोठा फरक हा आहे कीं, लहानांना मोठे प्रश्न तेव्हांच सुटतात; पण मोठ्यांना साधे प्रश्नही जड जातात.]

[चाल–विकट वाट वहिवाट]

'करूं नको कां असें? आणखी केलें तर होइल काय?'
"देव पाप देईल", ऐकतां हळूच मागें ये पाय!
'शपथ तुला देवाची जर तूं जाशिल माझ्या पुढें-पुढें'
"शप्पत सुटली साखर वांटलि" खुशाल गेला पुढें कुठें!
'नको अम्हाला उष्टें तुमचें आम्ही नाहीं खाणार'
"चिमणीच्या दांताचें आहे"—'हिमटा तूं अगदीं फार'
'एकदां तुला विचारितों कीं गट्टी कीं तुट्टी अपुली?
मिटलीस अढी बोटांची तर गट्टी दोघांची झाली
तुट्टी केलिस बरें 'आणखी एकदांच' तुज विचारितों
गट्टी किंवा तुट्टी?'—"आम्ही तुट्टीची गट्टी धरतों!"
उलगडा यापरी होतो बालकांचा क्षणामधें
त्याविणें जीव हा भागे थोरांचा अवघडामधें.

७ सप्टेंबर १९२१.

## तासाचा ठोका.

[ शा. वि.]

इच्छेचा हृदयांत नाद झडतो सेकंद चित्तांतला
साठांनीं मग त्यांचिया मिनिट जें तें यत्न हा जाहला
झाले यत्नहि साठ तैं सहजची आशा स्वयें पातली
इच्छा यत्न धरी करीं तंव यशें टाळीच वाजीवली!

## वैतागलेला.

[जे सुखानें राहूं शकतात ते असें कशाला म्हणतील ?]

[ चाल-किती रहावें तुजविण.]

इतुका अनुभव थोडा झाला ? हा जीव तरी पोळतसे
अनुचित कैसें ! कधीं वाटलें कपाळ जर फोडावेंसें
कांट्यांमधुनी जपुनी जपुनी किती सारखें चालावें !
सुसरीबाई पाट मऊ गे वरकरणी किति बोलावें ?
अदृश्य तारे अनंत असती आकाशामधिं यासाठीं—
सुंदर तारा लपवाव्या का काळ्या मेघांच्या पोटीं ?
मौज कशाची ? विनोद कसला ? व्यर्थ बोलणें डौलाचें
तत्त्वांचें कां सत्त्व पहातां ? निरर्थ सांत्वन शब्दाचें.
या जगताच्या स्मशानामधें जिवंत भूतस्वरुपानें
संचारुनि मी मला भिववितों त्रास न इतरांना होणें !

१६ आक्टोबर १९२१.

# पांखराचें घरटें आणि एक मुलगा.

[ चाल—भूपती खरें तें ]

कां न कळे परि पांखरें आपुल्याऐशीं
नाहींत खुषी राहण्या जमिनीपाशीं!

मग भीति कशाची न कळे त्यांना वाटे
भूवरी असति का झाडापेक्षां कांटे?

विश्रांती-भीती-वसतीच्या समयाचा
आसरा खरा पांखरां गमे झाडांचा!

त्यावरतीं अपुलीं घरटीं सुंदर छान
बांधिती स्वयें त्यामधें कशाचें न्यून!

तें घरटें पाहुनि चित्त चकितची होतें
मानवी बुद्धिची धुंदी उतरुनि जाते!

मृदु अंतर्भागीं सुखें रसिकता रमते
सौंदर्यलालसा तेथें गुंगुनि जाते!

कुशलता स्वयें तें करी सर्व विणकाम
ईशदत्तबुद्धी पराक्रमें अप्रतिम!

सांपडलें असलें घरटें फिरतां फिरतां—
बागेंत एकदां लहानग्या बाळाला.

वाटली मनाला मौज तयाची फार
ती आइस दावुनि होइल फारचि फार

हें सहज, तयाच्या मनांत सहजीं आलें
ते घरटें अपुल्या आईला दावियलें

त्यामधें पाहुनी अंडीं सुंदर दोन
बोलली माय ती बाळाला गहिंवरुन—

"हीं पिलें बिचारीं पाहिलींस का बाळा ?
किति दुःख जाहलें असेल त्या आईला !

भिरभीर फिरूनी तिनें सर्व तो बाग
अश्रुंनीं शिंपिला असेल जागोजाग !

तूं जरी जरासा कोठें ना दिसलास
किति जीव आमचा होतो कासावीस !"

मग डोळे भरुनी हातीं घेउनि घरटें
बागेमधिं आलें बाळ कोवळें परतें !

किति जपून होतें तसें जागच्याजागीं
ठेवून बाळ तें देवा करुणा भाकी—

'भेटवीं दयाळा, बाळें हीं आईला
नच हात पुन्हां लावीन शपथ यावेळां

ये आई ! अपुलीं पिलें सुखें सांभाळ
तव दुःख जाणिलें तिचा विनवितो बाळ.'

[ दिंडी. ]

परत घरटें तें जयाचें तयाला—
मिळुनि आई ती भेटली पिलांला
असें खचितचि जें जाहलें असेल
पाहायाला तें आपणा मिळेल !

म्हणुनि दुसरे दिनिं बाळ तिथें आला
कुठें घरटें नच आढळलें त्याला !

सहज पुशिलें तैं सांगितलें त्यानें
'मरुनि गेलें—भेटलें कोण जाणें!'

मेरो भेटो जग पूर्ण बेगुमान
कळुनि कोमल मन जाय कोळपून
—आणि झालें जें एकदां उदास
स्मरणमात्रें तें सर्वदा उदास!

३१ आक्टोबर १९२१.

## विसंवाद.

[ चाल—चित्रपटावरि रम्याकृतिच्या. ]

'विश्वासानें होतों त्यानें गळा अखेरिस कापियला!'
"कां विश्वासच टाकियला?"
'मनांतलें सांगितलें सारें हें माझें चुकलें काय?'
"यामध्यें शंका काय?"
'शब्द हिताचा सांगितला पण राग तया त्याचा आला!"
"सांगाया कुणिं सांगितला?"
'कमीपणा घेऊन राहतों परी समजती ते दुबळा'
"खराच दुबळा आणि खुळा!"
ज्याचें काळें नाहिं बोललों तो म्हणतो बावळा मला'
"काय म्हणावें मग तुजला?"
फजिती सद्गुणाचीही होतसे जगतामधीं
—आणि ती टाळण्यासाठीं कळलें पाहिजे अधीं!

११ नोव्हेंबर १९२१.

## रोज पैसा मागणाऱ्या भिकाऱ्यास.

[ चाल–भल्या माणसा० ]

रस्ता माझा हा जाण्याचा आणि तुझाही बसण्याचा
जातां येतां 'पैसा द्या हो' असा तुझा क्रम म्हणण्याचा

प्रथम फार–पण अजूनही तें मनास अवघड वाटतसे
त्वां मागावें, आम्हीं जावें तडक निघूनी पुढें तसें.

काय करावें परंतु याला इलाज अमुचाही नाहीं
पैसा पैसा मागितल्याविण पोटाला खाशिल कांहीं !

अमुचेंहि खरें तुझेंही खरें उपाय नाहीं दोघांचा
अवघड देणें, सवघड घेणें जीव खातसे दोघांचा !

—हवें कशाला इतुकें ?—नाहीं मीच एकटा देणारा
कितीक जाती येती आणिक एकटाच तूं घेणारा.

कुणीना कुणी रोज देउनी तुझें आपुलें चालतसे
एके दिवशीं मीहि त्यामधें अपुला पैसा देत असें.

२८ नोव्हेंबर १९२१.

## बसल्याबसल्या गाणें.

अर्धी बरें तें दिसेल का ?
दिसलें त्यापरि असेल का ?
असलें तरि तें झेपेल का ?
झेपलें, पुरें पडेल का ?
नसती पीडा हवीच का ?

# भिडेखातर.

[चाल—एडका मदन.]

चांडाळीण—ही भीड भिकेची बहिण ॥

ज्यानें दिला भिडेला थारा । त्याचा कोठें नसे दरारा
आव तयाचा पोकळ सारा । लागली कीड—खादाड भयंकर धाड !

कळतो मनास आंतिल कावा । उकलुनि बुद्धीनें सांगावा
—आणि हिनें साधावा दावा । कौटाळीण—ही भीड दावेदारीण !

असेल मनिं तें सर्व फसेल । नसेल तें हटकून घडेल
हातामधलेंही गमवील । आक्काबाई—ही, दुसरी कोणी नाहीं !

हिची स्वतःची भीड न ज्याला । त्याचा प्रेमा हिच्या जिवाला
प्रियकरास घालिते भरीला । लोकधारजिणी—हिजपरी असेना कोणी!

असगोत्रापाशीं संबंध । कारणाविना लोकप्रवाद
अपराधाविण प्रायश्चित्त । पुरवला जाळ—परि नको हिचा जंजाळ !

नसतां सहज कमविलें असतें । असुनी सगळें गमाविलें तें
स्मरुनी हिनें दिलेले गोते । घाला पूड—घ्या पुराच आतां सूड !

५ डिसेंबर १९२१.

# जळजळ.

[ चाल-पडला अभिमन्यू० ]

हिमालय अमुचा—अमुचा उंच जगीं
अधोगत आम्ही हतभागी!
समृद्धी गंगा—गंगा वाहतसे
आपदा आम्हां जाळितसे!
सुधारावृष्टी—वृष्टी भूपृष्ठीं
उपाशी नित्य सात कोटी!
सुपिक भूमाता—माता निज हातें
भरवूं न शके बाळांतें!
जगाची चैन—चैन सर्व पुरते
अम्रुला वस्त्र कमी पडतें!
जेथला तरुण—तरुण हीन दीन
तयांचा काय जगीं मान!
सुदुर्बल असुनी—असुनि तीस कोट
जसा तो छिन्न भिन्न कोट!
असावें जें जें—जें भूषण वहिलें
सकल तें दूषणमय झालें!
—त्यामुळें जळतें—जळतें हृदयांत
अश्रु अनिवार लोचनांत!

३० डिसेंबर १९२१.

## आयुष्य.

[ शार्दूलविक्रीडित.]

तेव्हां काय ? —सुरेख बेत सगळे होते मनासारखे !
एव्हां काय ? —समूळ ते बहुतसे झाले पुरे पारखे !
केव्हां काय घडेल नेमच नसे कांहीं जरी चिंतिलें
जेव्हां जें घडतें तयासि म्हणुनी आयुष्य हें वाहिलें ?

१६ जानेवारी १९२२.

## लेखणी.

[ शार्दूलविक्रीडित.]

कोरा स्वच्छ सफेत कागद कुणी शाईप्रती हांसला
शाई जाउनि काळवंडुनि तिनें स्वप्राणची कोंडिला !
लज्जेचें न हंसें करून, अथवा काळेंहि ना फांसुनी
हास्यातें, लिहिते कशीं विमलशीं हीं अक्षरें लेखणी !

२७ जानेवारी १९२२.

## एका चित्रास.

[ चाल—शैवालें युक्त जैसें.]

चित्रचि तूं तरि पहातां ! भीड मना वाटते
त्या योगें दृष्टि तूंतें चोरुनिया पाहते
कशि लज्जावति म्हणावी वसन न हें सांवरी ?
न म्हणावी तरि कसें तें करिं धरिलें कटिवरी !

२ फेब्रुवारी १९२२.

## माघमासीं पाऊस.

[ अवेळीं घडणाऱ्या गोष्टींचें कारण काय व परिणाम काय? 'कांहीं नाहीं.']

[ दिंडी.]

माघमासीं पाऊस हा कशाला
परी पडतो मग 'कशाला' कशाला?
म्हणुनि अनपेक्षित कांहिं टळत नाहीं
नको तें तें घडतसे अचुक पाहीं!

माघमासीं पाऊस पडत आहे
भिजत मार्गें जनवृंद जात आहे
थाट सारा वाहून आज जातो
निकट कोठें आसरा तो पहातो!

माघमासीं पाऊस पडुनि गेला
गगनवदनींचा डाग धुवुनि गेला
अवेळींचा तो संपला उबारा
पुन्हां अपुला आहेच थंडिवारा!

१८ फेब्रुवारी १९२२.

## जगाचें वर्णन.

[ साकी.]

जिकडेतिकडे दगदग लगबग जिगजिग फारच फार
तगमग भगभग सदासर्वदा बेजारी बाजार!
जग हें मोठें परंतु त्याचें वर्णन इतुकें थोडें
मात्र 'कसें मग तें जगतें?' हें त्यांतहि मोठें कोडें!

# चूक.

[ उपजाति.]

पहा किती चूक असे सुरेख
नसे कुठें वांकडि नीट टोंक
आहे बडेजाव हिचा असा कीं,
डोक्यावरी बैठक धीट ठोकी !

कधीं रिकामी बसणार नाहीं
बसूं न देईल तशी तुलाही
शोभा कुणाची बरवी करून
राही पुन्हां आपणही सजून !

इलाज तेव्हां जरि कांहिं नाहीं
तरी तुला एकच सूचना ही
'संक्रांत केव्हां ?' इतुकें कळाया
पंचांग हें ठेव चुकेवरी त्या.

वा आरसा टांगुनि ठेव तेथें
उभ्या उभ्या त्यांत पहावयातें
तेणें चुकीची पडसावलीही
अचूक नेईल पुढें कुठेंही.

२८ फेब्रुवारी १९२२.

# एक गोड विचार.

"Every thing is tending towards good."

[वसंततिलका]

आहा! किती मधुर सुंदर हा विचार
दुःखें अपार झणिं जाति विरून पार
येतें नवें बळ पुन्हां श्रमल्या मनातें
'प्रत्येक गोष्ट (नित) जात असे शुभातें'

हें सत्य नित्य जरि चित्त धरून राही
दुःखास दुःख कधिं तो म्हणणार नाहीं
आशा निराश तरि केंविं करील त्यास
कष्टास कष्ट पडतील तिथेंच खास!

आनंद ऐकुनि विचार मनास झाला
तत्प्रत्ययास्तव जगीं जिव हा भुकेला
मित्रा! तरीहि हळवें मन हें तयानें
पुष्पापरी सुकुनि जात क्षणाभऱ्यानें!

संताप ते–अधिक तापुनि मात्र गेले
हृद्रोग ते–हृदय जर्जर फार झालें
दुःखें दिनानुदिन वाढत मात्र जाती
गोडे विचार करपून–जळून जाती.

# नटवर्य गणपतराव जोशी.

[आर्या]

देवगणीं मान जसा पहिला ठरला असे गणेशाचा
नटवरगणीं गुणानें तोच असे मान या गणेशाचा.
नटनायक हा झाला सेनानायक जसा स्वसेनेस
यानें पराक्रमानें केलें सकलां अपात्र तुलनेस.
बुधवारीं शनिवारीं ही स्वारी जेधवां करी स्वारी
वैरी सर्व निवारी शूर असा हाच नाट्यकैवारी !
देवाज्ञा त्या झाली अर्थ असे हाच या अनर्थाचा
कीं स्वर्गींही नाहीं गणपतरावापरीस नट साचा !
लोकीं बहुधा नाहीं जें कांहीं पाहिजे तसें कोठें
परि गणपतरावांच्या नाट्यापुरतें ठरेल हें खोटें.
अभिनय कंठमधुरता रसज्ञता रूप डूप आवेश
गुण गणपतरावांचे परि सहजपणा तयांतला खास.
पडदा कपडा अथवा नट ते करतील काय बेरंग
हेरंबाचा महिमा जाती निरसून सर्व बेढंग.
'गणपतराव नटांचा नट नाटक नाटकांत हॅम्लेट'
संकट कुणा न पडतां संमत सर्वांस हाच संकेत.
जीवंतपणीं नायक होउनि मेला कितीकदां खोटा.
मेला खरा परी हा नायक उरला खराखरा मोठा !

१३ मार्च १९२२.

# मोहिनी.

[ चाल– **तेथेंच उभी कीं आलें** ]

मोहिनी:––कुणि म्हणो बिचारें गैर
परि रुचे मनाला स्वैर––यौवनीं
अडखळत मंदपदिं जाणें
मज रुचे न लाजिरवाणें––मुळिंच तें
आलें मी झुळुकेसरशीं
त्यामुळें न पडलें पाशीं––जिवलगे
सखी:––सांगसी । वळुनि पाहसी । उत्सुका अशी
दृष्टि कां मागें । कळतात सर्व हीं सोंगें––मजप्रती
मोहिनी:––छळुनि घे विनोदानेंही
तूं खुशाल मम 'ना' नाहीं––मुळिं तया
मी चपला मज चपलेची
उपमा ही तुझिया मनिंची––साजिरी
ही रीत त्याच चपलेची
निमिषांत लपुनि जायाची––नाहिं का ?
सखी:––स्वैरिणी । तीहि चमकुनी । नेत्र दिपवुनी
पयोधर वसनीं । घेतसे क्षणीं लपवोनी––नाहिं का ?
चालतां पदर हा वेगें
सांवरितां सरला मागें––म्हणुनि का ?
त्यामुळें रंग कुंचुकिचा
रंगला अधिक गमतीचा––म्हणुनि का ?

लपवितांहि नाहीं लपली
लज्जेची चंचल वल्ली--म्हणुनि का ?
मोहिनीः—चावटे। तुजसवें कुठें। उपवनीं इथें
नाहिं येणार
सखीः— मोहनासवें येणार—मोहिनी ?

१० एप्रिल १९२२.

## बाळांनों.

[ शार्दूलविक्रीडित. ]

बाळांनों, तुमच्या मनोहर मुखीं आनंद क्रीडा करी,
आम्ही दुर्मुखले सदैव कुढतों चित्तांत कांहींतरी;
बोला, मंजुळ गोड तें सरळ तें कांहींतरी त्या मुखें,
आम्ही कृत्रिम, दुष्ट मात्र वदतों जें जें मनाला दुखें !

हांसा, तें सहजीं विशुद्ध हृदयें कांहीं मजा पाहुनी,
आम्हीं तें उपहास याच विषया टाकीयलें वाहुनी;
जें जें व्यर्थ म्हणून फेंकुनि दिलें, केली उपेक्षा पुरी,
लावा हात तयास आणि बरवें सोनें करा लौकरी !

आईबाप असोत कोणि कुठले तुम्ही सदा गोजिरीं
वैरी वैरहि जातसे विसरुनी तुम्हांस पाहे जरी !
संसारीं मग मायबाप—भगिनी—बंधूप्रती सर्वदा
देतां तोष किती कुणास तरि तो येईल का सांगतां !

बाळांनों जग सर्व भेसुर दिसे—तें मात्र आम्हांमुळें !
आशा, प्रेम, समुन्नती, सुख तसा तो स्वर्ग तुम्हांमुळें !

२० एप्रिल १९२२.

# दूर्वा, बेल आणि तुळशी.

[ शार्दूलविक्रीडित.]

दूर्वा बेल सुगंधशालि तुळशी हीं सर्व पानें तृणें
त्यांना दाम नकोत ते श्रम नको धुंडावयातें वनें
कोणाच्या परड्यांत बेल तुळशी प्रत्येक गेहांगणीं
पाण्याच्या नित आसऱ्या पसरल्या दूर्वा न लावी कुणी !

देवाला असल्या सवंग जिनसा त्यांची असे आवडी
ती पूजा प्रिय फार तद्विरहिता तो मानितो वावडी
जे काबाड करून कष्ट थकशी जेणें सदा कुंथशी
ते तूंतें लखलाभ हो ! प्रभुजिची इच्छा नसे रे तशी !

जीवात्मा जगतीं सदा तळमळे वारें सुखाचें नसे
ओझें जीवित होतसे जड समाधानावरी तें रुसे !
गेल्या पायदळीं पडून तुळशी दूर्वा पहा रे पहा
एखादी बघ राहिली प्रभुपदीं आतां तरी ती वहा.

—लाखोलीच नको परेश तुझिया संतुष्ट एकावरी
एकाचीच खुशाल वाहित रहा लाखोलि लाखावरी !

३ मे १९२२.

# आवडत्या कवितेस.

[ शार्दूलविक्रीडित. ]

तूं आहेस कशी कुठें दिन तुझे जातात दुःखीं सुखीं ?
नाहीं कांहिं विचारपूस अगदीं केली कधींही तुझी
इच्छा काय तुझी कधीं न पुशिलें कोठून ती ठाउकी ?
ध्यानीं होतिस सारखी परि कुठें होती जगीं ओळखी ?
देवी, प्रीति तुझी असे मजवरी हें सांग आधीं खरें
सांगे गूज कुणास शब्द कळला नाहीं असें गोजिरें
होतें का मनही तुझें तुजविशीं माझें जसें घाबरें ?
भेटीनें गमती मनोरथ तुला झाले—मिळाले पुरे ?
तूं आहेस कशी ? जशी मज हवी होतीस तैशी * *
तूं आहेस कुठें ? अशी निकट या नेत्रीं जशी बाहुली
दुःखीं आणि सुखीं समागम तुझा आहे सुखाचें सुख
इच्छा आपुलिया मनांत कुठली येईल ती आणिक ?
—एवंभावविशिष्ट हें हृदय मीं तूंतें असे अर्पिलें
त्याचें कांहिं करीं खुशाल धनिनी, सर्वस्व आहे दिलें.

८ मे १९२२.

# हा कोण ?

[ चाल—चंद्रकांत राजाची कन्या. ]

चढाव पायीं काचा वरती पोटाची ढेरी
घामट कपडे जाडेभरडे मुद्रा अविकारी
अवजड सोन्याच्या बाळीनें ओथंबे कान
संजाबानें कान धरोनी सोडियली मान.
असा ‘अमुक’ हा वरुनी कोणी ओळाखिला तेव्हांच
तरी आंतुनी कळावयाचा नाहीं तो केव्हांच !

९ मे १९२२.

## आग.

[चाल–हे मना०]

यातना
सोसवेतना
दया नच कोणा
तरि मना लोचटा त्वेष तुला येईना!
जाणुनी
उपेक्षा मनीं
तयाचे नादीं
लागसी दुर्बला लाज तुला नच अगदीं!
अपमान
मृत्यु हा जाण
येउनी तुजसी
कोणत्या प्रकारें सांग जगीं जगतोसी?
दुर्दशा
परिस्थिति-कशा
फोडिते पाठ
जग हंसतें म्हणतें तोंडावरि मुर्दाड!
झडझडुनि
दोष फेकुनी
विहित देखोनी
जा वेगें उडुनी दार पार फोडोनी!
कोठुनी
हवे तेथुनी
आण स्फुल्लिंग
१२ मे १९२२. पण लाव आपुल्या मना एकदां आग!

# संध्याकाळ.

[ शार्दूलविक्रीडित.]

गांवींचें कुणि भेटलें, कळविलें आईस येतों घरीं
तीचा येइ मला निरोप 'शनिवारीं ये घरीं रे हरी'
आला तो शनिवार आणि सरली शाळा सकाळींच ती
वेळेवांचुनि अन्य कांहिं नव्हती माझी तयारी किती !

अभ्यासास्तव राहणें परगृहीं आलें नशीबामधें
आईबाप गरीब त्यांत मग तें कैसें सुखाचें मुखें !
कांहीं क्षुल्लक काम उद्भवुनिया तैं चारही वाजले
होवो रात्र परंतु जाउं म्हणुनी मीं टाकिलीं पाउलें !

धो धो पाउस कोसळे सळसळे वारा नदी ओरडे
झालों चिंब जुनाट छत्रि तुटली धावून आलें रडें
जाई वाट तृणांतुनी भय भरे त्या किर्रे शब्दें मना
संध्याकाळ भयाण घेरुनि तदा त्या वाढवी वेदना !

झाली रात्र अखेर—आणि तरि मी आलों घरीं आपल्या
आई वाट पहात दारिं—अवघ्या त्या यातना संपल्या !

११ जून १९२२.

# भैरवी.

[ चाल—नृपतिकन्या कां.]

प्रभो पूजा ही अमुची बहु गोड माना
सान हीं प्रभुजी मुलें । प्रिय दूर तीं फुलें
अबल म्हणुनी । करिं न मिळुनी । पुजुं पदांना ॥ १ ॥

## हृद्गत आणि अश्रु !

[ शार्दूलविक्रीडित.]

कोणा हृद्गत आपुलें कथुं कुणी ऐकेल का तें बरें ?
आहे काय कुणा जगीं हृदय जें जीवंत ओलें खरें ?
शंका संशय किंतु तत्क्षणिं कुणी टाकील का जाळुनी ?
आहे काय सहानुभूति जगतीं जी इच्छितों मी मनीं ?

आहे आणि असेल, नाहिं म्हणणें हें पापची होइल,
देवाच्या जगतामधें अखिलही जें वाटतें दुर्मिळ;
देवा आणि जगा, तुझा मग असा मीं काय केला गुन्हा ?
झालों व्याकुल भाकिल्या विनवण्या त्या व्यर्थ साऱ्या पुन्हां !

चित्ता, कोमलता तरीहि अपुली टाकूं नको सांवरी,
पाळी प्रेमलता; अशी उगिच कां ही आग तीच्यावरी !
सद्बुद्धी, करुणा, उदारमति यां तोडून व्हावें कसें ?
यां सर्वांसह शोध संतत करी कोणी असे कीं नसे ?

—नाहीं कोणि म्हणून हृद्गत सुनें तें राहिलें—राहिलें !
अश्रू आजवरी किती म्हणुनिया मीं गाळिले—ढाळिले !

१७ जून १९२२.

## स्वातंत्र्याची प्रकृति.

[ शार्दूलविक्रीडित.]

माता बालक आपुलें कधिं कुठें पाहीचना पोरकें
कांतेचें अपुल्या अनाथपण तें नाथा जसें पारखें
स्वातंत्र्या, असलें चिरंतन कधीं सौभाग्य आम्हांप्रती ?
"बा माझी प्रकृती कठोर, करुणा नाहीं हवी तूज ती"

२४ जून १९२२.

## संध्याकाळ.

[शार्दूलविक्रीडित.]

संध्याकाळच काळ एक अपुला आहे जगीं आगळा
जीवाशा सगळ्या स्मरून रमतो तैं जीव हा मोकळा !
दुःखक्लेश विनाश पावुनि जगद्बंधाप्रती तोडुनी
जीवानें जणुं आपुलाच म्हणुनी हा घेतला मांडुनी !

संध्याकाळ असा स्वतंत्र अपुला पाहूनिया पातला
आशेचा सगळा जुळून जमला बेफाम गोतावळा !
झाली रात्र परंतु लौकर पुढें काळोख दाटूनिया
त्यांचीं भेसुर तीं भुतें भिवविती गाऊन नाचूनिया !

संध्याकाळ परंतु एक शुभ तो आला सुदैवें कधीं
नेत्रांना नव चंद्रकोर दिसली आनंद चित्तामधीं.
'आतां काय' म्हणून जीव भुलला वेडा क्षणीं जाहला
गेली कोमल कोर तोंच निघुनी, तो हर्ष कोमेजला !

—संध्याकाळ अनेक त्यांतचि जरी हा एकही टाकिला !
'ती-ती कोर' जिवंत आस म्हणुनी हा एकची गाइला !

२७ जून १९२२.

## पाठमोरी.

[दिंडी.]

चुंबनाचें भय कपोलास वाटे
ह्रदीं आलिंगनभयें कंप दाटे
सलज्जा मग सुंदरी चारुगात्री
प्रियासंनिध बैसली पाठमोरी !

जून १९२२.

## उदास कविता.

[ शार्दूलविक्रीडित.]

सृष्टी सुंदर नित्यनूतन सदानंदा चमत्कारिणी
चित्ताला तर काय—दंग करिते ती कल्पना स्वैरिणी!
सूक्ष्म स्थूल विशाल भव्य भरलें तीमाजि जेथें तिथें
भक्तीचें मज भाग्य संतत तिच्या तें लाभलें—लाभतें.
माझें तें घर उंच आणि सगळ्या गांवामधें चांगलें
माझे वाडवडील थोर, कुलही प्रख्यात जातींतलें
आई प्रेमळ काळजी करितसे ती नित्य माझी किती
माझे बंधु गुणी सुबुद्ध करिती प्रीती किती ना मिती!
वेळा त्या सगळ्या समान नसती कांहींतरी होतसे
कोणाचा अपराध फार नसतां भारी व्यथा देतसे
प्रीती ओसरते पुन्हाहि भरते, वाटे 'असें कासया?'
केव्हांही परि तें अगम्य न कळे कोडेंच जीवास या!
—त्यायोगें हळवें सदैव मन हें दुःखी सुखी सर्वदा
ही माझी कविता उदास असते—माझीच ती तत्त्वतां!

५ जुलै १९२२.

## जांवयाला तांब्या.

'तांब्याभांडें, समई, ताम्हन, शेलापागोटें
बोलीच्या बाहेर दिलें हो, दिलीं सहा बोटें!'
सासूबाई, स्वमुखींचें हें उदारपण तुमचें
ऐकुनि, ऐका, शब्द आपुल्या जांवइबापूंचेः—
"किंमत नाहीं मला अहो त्या तांब्याभांड्याची
'पुतळी'पुढती महती गातां कसली कवडीची!

जुलै १९२२.

## तोंपर्यंत.

[ शार्दूलविक्रीडित. ]

जोंपर्यंत असाच मान अपुला आम्हीं नसे राखिला,
सारा तोंडपुजेपणा खुलविण्या तोंडावरी माखिला.
आहे स्वार्थ जगांत सार्थ इतुकें नाहीं पुरें जाणिलें,
शुभ्राशुभ्र अमूक यांत इतुकें नाहीं खरें पाहिलें;

सत्तेच्या अपुल्या घरांत दडल्या चोरापरी राहतों,
लोकाला बघुनीच दूर पळतों भावावरी भुंकतों,
दारोदार भिकार जें भटकतें कौतूक त्याचें मना,
आम्ही श्रेष्ठ पवित्र लोक जगतीं खोटी अशी भावना;

स्त्रोद्योगांत खरी नसे कुशलता सारी कृती वेठिची,
कामाची कुचराइ घाण इतुकीं पुण्यें भलीं गांठिचीं
'लक्ष्मी चंचल, सर्वही क्षणिक हें बोलावणें मृत्युचें
तोंडाची टकळी कली सकल' हा वेदांत भारी रुचे;

हिंदुस्थान असा पिडून अडला लाचार नानापरी
—तोंपर्यंत करील काय अगदीं तो देव आला तरी!

९ जुलै १९२२.

## खैबरखिंड.

[ चाल—धन्य शिवाजी. ]

—हिनें फोडिला हिमालयाच्या छातीचा कोट
गुलाम केले हिनें जगांतिल लोक तीस कोट !
भूगोलाच्या विद्यार्थ्या, बघ ही खैबरखिंड
इतिहासाच्या विद्यार्थ्या, बघ ही अपुली धिंड !

२६ जुलै १९२२.

## काकुडलेला.

[ चाल—कसें मी मारूं.]

काकुडलेला—झाडावर पक्षी बसला !

झिमझिम पाउस पडे सारखा । उबारा न वातास ठाउका
सूर्य असूनी होय पारखा । केविलवाणा—वृक्षावर पक्षीराणा !
पंखहि मिटले तोंडहि मिटलें । भय जीवाचें जणूं वाटलें
म्हणून त्याला सर्व बिलगले । तेवढे डोळे—पाहती गरगरा सगळें !
—हा मम जीवहि काकुडलेला । समदु:खी तो पाहुनि रमला
तोंच पसरुनी निज पंखांला । काकुडलेला—कुणिकडे उडोनी गेला !
उत्कंठित मन अधिकचि झालें । अधीर झालें-वेडें झालें
झडकरि कोठें उडून गेलें । काकुडलेलें—-आशेनें भरुनी गेलें !

१९ जुलै १९२२.

## केशवसुतांच्या कवितेच्या शेवटच्या पानावर.

[ साकी.]

पूर्वकवींच्या हातुनि सुटलें त्यास बांधण्यासाठीं,
दुष्ट विधिनिषेधांची जडली खोड मोडण्यासाठीं,
मानव्याची काळालाही जरब लावण्यासाठीं,
शब्दानें सत्तेचीं भूतें थरकांपविण्यासाठीं,
खडकांमधुनी जिवंत निर्झर झुळझुळण्यासाठीं,
स्वतंत्रतेचें स्वच्छंदाचें बीं पेरायासाठीं,
—आणि आजच्या काळीं जें जें हवें नको त्यासाठीं,
हा केशवसुत कवि अवतरला ! भाषा धन्य मराठी !

* * *

उंच तयाचा प्रतापशाली झेंडा फडकत राही,
जीवेंभावें करी पहारा चरणीं एक शिपाई !

२० जुलै १९२२.

# गरीब आईचें गाणें.

[ चाल–अजि अक्रुर हा.]

तुज अजुनि कशी झोप नये रे बाळा   किति वेळ राजसा झाला !
घरभर सारें काम किती हें पडलें   करणार कोण तें अपुलें !
मम बाळाचे येति निजसरे डोळे   मग आधीं न्हाऊं केलें
हातापायांचा थांबू दे हा चाळा   लागू दे आतां डोळा.
समजलें हवें गाणें तुजला गोड   लागली तुला ही खोड
पण बाळा रे गरीब आपण आहों   कोणतीच खोड नको हो !
हें आणिकही हवें कळाया तुजला   सारख्या न साऱ्या वेळा !
संसार सदा नाहीं बाळ सुखाचा   ना सर्व काळ गाण्याचा.
तूं बाळ कसें सदैव गोजिरवाणें   गाणेंही मंजुळवाणें
लागेल तुम्हां दुःखाग्नीची झळई   कोमेजुनि जाल अगाई !
म्हणुनीच तुला म्हणवेना मज गाणें   जागसी धरुनि तरि धरणें !
तरि ऐक अतां गाणें हें हृदयाचें   हें नव्हे बरें कृष्णाचें
त्या कृष्णाचे आईबाप गरीब   हतभाग्य शृंखलाबद्ध
आठा वर्षांच्या परी बाळकृष्णानें   सोडविलें कैवारानें !
विसरल्यें पहा कृष्ण आठ वर्षांचा   तूं मात्र आठ महिन्यांचा !
म्हणुनीच अतां निद्रा घेइ सुखानें   जरि कधीं न म्हटलें गाणें !

२२ जुलै १९२२.

# कांहीं पानें.

[ ह्या पानांत कांहीं त्राण नाहीं असें जर कोणाला वाटलें तरच मी त्याला धन्य म्हणेन आणि स्वतःला समजेन.]

[ उपजाति.]

प्रत्येक झाडावरि पान आहे
वारा तयाला झुलवीत राहे
झुळूक त्याची कधिं लागतांच
थोडें तरी हें मन वेधतेंच !
पत्रावळींचीं जितुकीं सु-पानें
केळीस त्यांमाजि न कोण वाने ?
बेतास मोठ्या उपयुक्त तेंच
फेका परी जेवण संपतांच !
नादिष्ट मारीत सदैव तान
तेणें करी पिंपळपान ताण !
जातां बिचारें अपुलें गळून
गाईल त्याचें मग कोण गान !
कांटे कुणाला कवणास ताठे
आकार ना एक कुणी उभटे
कुसें कुणाला, कितिकांस दांत
गुणी कुणी तों कुणि घातपात !
सर्वांहुनी सानच चिंचपान
संबंध त्याचा न कुठेंच जाण.
तदंतरात्मा डवरून राहे
डुले खुले वेळिं गळून जाये !
हें शेवटीं पान अतां विड्याचें काया अधीं नाकच नासक्याचें !
लावा चुना कात विनंति हीच होवो न हें तीक्ष्ण तसें कडूच !

२८ जुलै १९२२.

# आपुलकीचें गीत.

[ चाल—चंद्रकांत राजाची कन्या.]

जन्म दिला या जगांत जीनें ती अपुली आई
माता कांता राही तेथें घर अपुलें होई!

तात आपुला सर्वस्वाची कीर्ती संपत्ती
'खुशाल कर जें तुला हवें तें' म्हणून दे हातीं!

'आई आई' हांका मारित जे जवळी जमती
आपआपुले ते ते भाऊ 'अरे तुरे' म्हणती!

असलें तरिही खपेना जिला जर वदलें हीण
लहान असली तरीहि ताइ ती अपुली बहिण!

—आणि आपुली ती?—काय तिची गोष्टी सांगावी
तिच्यावांचुनी जगीं कशाला वसती मागावी!

मित्र आपुला पुरें आपणा ओळखितो तोच
खुल्या दिल्याचाही दिल सहजीं जेथें खुलतोच!

वडिलार्जित गृह जेथें अपुलें तें अपुलें गांव
आईबापांनीं ठेवियलें तें अपुलें नांव!

व्याकरणाविण बोली आली ती अपुली भाषा
पैशासाठीं नसे नकोसा तो अपुला पेशा!

जेथें कांहीं नवखें न दिसे तो अपुला देश
घरांत आपण ज्याचे असतों तो अपुला वेश!

धर्म आपुला आचरिला जो मातापितरांनीं
चाल आपुली पाळितसों जी जरि हंसलें कोणी!

हृदयामध्यें असेल जरि तरि तो अपुला देव
ज्याचे हातुनि अशक्य सुटणें तें अपुलें दैव !
मानियलें तर अखंड आहे जग सारें अपुलें
कोणी नाहीं अपुलें तरमग कोण बरें अपुलें !
आपुलकीचें गीत गाइलें मराठि बोलून
माय जानकी तिला अर्पिलें चरणां वंदून !

नागपंचमी शके १८४४.

## संध्याकाळ.

[ शार्दूलविक्रीडित. ]

झालें जाउनि वर्ष एक अवघें भाषा जगाची अशी
अल्पत्वास महत्त्व नेत असतें, रीती जगाची कशी !
तीनें आपुलिया मनांत म्हटलें 'मी तीनशें साठ हे—
संध्याकाळ पहात वाट अजुनी येणें नसे जाहलें !'

संध्याकाळ अनुक्रमें प्रगटतां 'तो हाच' ऐसें मनीं
येवोनी क्षणमात्र जीव हंसवी–व्हावी निराशा क्षणीं !
झालें वर्ष–पुढें हर्ष अगदीं कोठें तिला राहिला
तों एके दिवशीं निरोप स्मरला–चित्ताप्रती लागला !

'कांते, सोडुनिया तुला बहु दुरी युद्धावरी जात मी
माझ्या आठवणी तुला तव मला त्या तेवढ्या नेहमीं
केव्हां येइन मी? जरी जय तरी येईन केव्हांतरी
स्वर्गीं भेट निदान होइल जरी नाहींच आलों तरी !'

—त्या शब्दें–न शरें–किती अवचितां आयुष्य तें संपलें !
त्याचेंही उरलें तरी न उरलें–तेव्हांच तें संपलें !

१२ आगस्ट १९२२.

# त्याच जुन्या श्लोकाची आठवण.

[ शार्दूलविक्रीडित.]

"डोळ्यांनीं बघतों ध्वनी परिसतों कानीं पदीं चालतों
जिव्हेनें रस चाखितों मधुरही वाचे अम्ही बोलतों
हातांनीं बहुसाल काम करितों विश्रांतिही घ्यावया
घेतों झोंप सुखें फिरूनि उठतों ही ईश्वराची दया"

डोळ्यांनीं बघणें ध्वनी परिसणें– कांहीं न अव्हेरणें
कोठेंही फिरणें, चवीस बघणें, निर्धास्त तें बोलणें
हातांनीं सुचतांच कांहिं करणें विश्रांति ती कासया?
येते झोंप कुठें क्षणांत पडतां, ही ईश्वराची दया!

उत्कंठा अनिवार सर्व विषयीं तेव्हां तसे वागलों
चिंता ही अनिवार सर्व विषयीं आतां असे भागलों!
डोळे हे फिरती, बधीर बनती हे कान, हे पायही
देवा, कांपति–आणि तूज अमुची नाहीं कशी कींवही!

—कोठें हारपली दया पुनरपी कोठें पुढें भेटणें?
यासाठींच अजून आठवण ही श्लोका, तुझी काढणें!

१९ आगस्ट १९२२.

# गौरीशंकर.

[ शार्दूलविक्रीडित.]

गौरीशंकर—आणि उंच दुसरें नाहीं जगीं कांहिंही
तेथें स्वर्ग, निदान सन्निध; तशी खोलांत सारी मही!
कीर्तीचें—गिरिचें नव्हे—शिखर तें अत्युच्च अत्यद्भुत
कोठें ईश्वर या जगीं जर तरी तेथेंच तो राहत!

जें कोणी जगतीं वरी शिर करी त्याचेवरी जाउनी
डोकें काढिन मी वरी सतत ही कांक्षा नराचे मनीं
त्या योगें—'सगळेंच मी मग पहा घालीन पायातळीं
माझें शीर्षच उंच, उंच शिखरापेक्षां सदा भूतळीं!'

बोले धीट तशी तयारि करुनी वेगें चढूं लागला
कांहींसा चढला तिथेंच बघुनी आश्चर्य तो गुंगला
थोडा जाइ पुढें तसा—परि तिथें तद्यत्न ते कुंठले
दोन्हीही—जय नी पराजय—मिळे स्वारीहि खालीं वळे!

—जातां मानव यत्नसानु चढुनी जेव्हां वरी पाहतो
तों सर्वत्र प्रभो अगम्य तुमचें ऐश्वर्य आलोकितो!

२३ आगस्ट १९२२.

# एक घाव.

[ साकी ]

एक घाव नी दोनच तुकडे काष्ठाचे होतात
एक घाव पारतंत्र्य, तुकडे राष्ट्राचे ना गणित!

## सालाबाद.

[ शार्दूलविक्रीडित. ]

व्याख्यानें हरिकीर्तनेंहि ललितें तीं गायनें भोजनें
मेळे, मंडप, ते दिवे, चवघडे, आरास, संमेलनें
ते कार्यक्रम वर्गण्या जुळविती सन्मान्य ते शिष्ट ते
सालाबाद चुकूनही न चुकती माहात्म्य त्यांचेंच तें!

त्या त्या उत्सवदेवता परि कधीं संतुष्ट झाल्या असें
नाहीं येत दिसून, चालत तरी सारें जसेंच्या तसें
होता वा नव्हताच हेतु कसला त्यामाजि? हा प्रश्नही
सालाबाद ठरीव सर्व करितां येई न चित्तांतही!

ऐसें कांहितरी करून अपुली, जाईल का दुर्दशा?
राखूं व्यर्थ करून उत्सव असे त्या पूर्वजांच्या यशा?
आशा, जोम, मनांत बादळ कधीं जाईल का माजुनी?
निर्धारें करुं काय एकतरि ती युक्ती मनीं योजुनी?

सारे उत्सव 'उत्सवास्तव' अशी बुद्धीहि जेव्हां चुकूं
सालाबाद करून उत्सव असे श्रेयास त्यांच्या मुकूं!

२८ आगस्ट १९२२.

## चतुष्टय.

[ इंद्रवज्रा ]

शिष्टासवें ताटकळून गेलों
क्लिष्टामुळें जेरिस फार आलों
नष्टा तुझें भूत धरांत मान
वाटे बरा दुष्ट तुम्हां बघून!

## समाधान.

[ शार्दूलविक्रीडित. ]

जें जें संभवनीय शक्य घडलें कांहींतरी त्यांतलें!
नेमानेम जसा तसेंच घडतें चित्तावरी कोरिलें!
इष्टानिष्ट अशी वृथा निवड ती भारी मना लागते!
होतो खेद खराखुरा निशिदिनीं आतां समाधान हें!

३१ आगस्ट १९२२.

## चतुर चोरी.

[ दिंडी ]

आजतरि मी कां व्यग्र नको होऊं?
स्वस्थ चोरी होऊन कसा राहूं?
शक्य नाहीं, राहीन मी उदास
नको कांहीं, कांहीं न ये सुखास!
कुणीं चोरी केधवां कुठें केली,
गोष्ट डोळ्यादेखतां सर्व झाली
—आणि अवघा हातांत या तपास
तरी बसुनी मी राहतों उदास!
नवें वैभव लाभलें असें वाटे
शोक झाला तरि मोद फार दाटे
वियोगानेंही येतसे सुयोग
दुःखमय कीं रम्य हा कथाभाग?
चोरियेलें सर्वस्व सवें नेलें
स्मृतीपुरतें मागुतें ठेवियेलें
चतुर चोरी ही प्रीतिचिया गावीं—
लाभली ती मज लागतसे गावी!

५ सप्टेंबर १९२२.

# आह्वान.

[ मंदारमाला.]

हा देव ही प्रीति कर्तव्य आशा तशा कल्पना भावना कामना
आहेत–आहेत, आहे तयांचा लळा सारखा सारखा मन्मना
भावें बसोनी तया सन्निधानीं मुखानें मुखानें तुझा संकटा
आह्वान आह्वान देतों तुला हें तसें सांगतों मी नसे एकटा !

७ सप्टेंबर १९२२.

# विलक्षण वाटसरू.

[ शार्दूलविक्रीडित.]

कोणालाहि जरी प्रवास चुकला नाहीं तरी कोणिही
आनंदें क्रमितो स्वमार्ग न दिसे आहे किती मौज ही !
हा जंजाळ, अथांग सागर, तसें हें चक्र या कल्पना
संगें सोबतिला प्रवास रडतो 'हो ! यातना–यातना !'

तेथें वाटसरू विलक्षण कुणी आला कधीं एकदा
सारा मार्ग उदास रूक्ष बघुनी भारी मनीं खोंचला
झाला खिन्न जरी प्रसन्न, मग तो त्या क्षुण्ण मार्गावरी
कांहीं एक निरामयार्थ वितरी स्वर्गांतली वल्लरी !

सारे वृक्ष जुने परी डवरवी तेथें नवी पालवी
फोडोनी खडकास पाझर झणीं तृष्णाहि ती भागवी
होऊनी समपातळींत पथ तो धक्के चुकावेत ते—
यांसाठीं झटतो–प्रवास करतो कीं सौख्य येवो तिथें !

—आम्हांला कळतें–असेल तसल्या मार्गें पुढें चालणें !
त्याला हें कळतें—नसेल तसल्या मार्गास चोखाळणें !

२० सप्टेंबर १९२२.

# त्यानें मजला हांसविलें.

[चाल–ला बाइ ला]

मन खिन्न जग सारें झालें भिन्न !
संबंध हवा कशाला तो बंध !
मी तुसडा दूर भटकलों मग वेडा !
साहेना कटु अनुभव आले नाना !
थांबेना दूर दूर हो क्षणक्षणां !
बोलेना ओठावरच्या शब्दांना !
गाईना हृदयींच्या संगीतांना !
पाहीना .... .... ....
.... परि फुललेल्या पुष्पांना !
तोडियलें फूल तेंहि हातीं आलें.
पुन्हा तसा पुढें चाललों जसा तसा.
वाटेंत मूल खेळतें मौजेंत.
तो वदला 'फूल तेवढें द्या मजला'
त्यास दिलें त्यानें मजला हांसविलें !

* * *

पुष्पांचें तितुकें जग हें मौजेचें
बाळांचें तसेंच भारी गमतीचें
इतरांचें नसे कशाचें–एकाचें !
–नी माझें म्हणुनि सुखाचें–दुःखाचें !

१३ सप्टेंबर १९२२.

# आयुष्याची घडी.

[शार्दूलविक्रीडित.]

योजावें मनिं एक आणि भलतें व्हावें-करावें कुणीं
अर्थाचा करुनी अनर्थ नसत्या दोषास केलों धणी
नाहीं मोल गुणास एक कवडी सद्धेतुची रेवडी
'आयुर्ब्रूहि' घडोघडीं बिघडतां घालूं कशी रे घडी!

१५ सप्टेंबर १९२२.

# उद्यांची गोष्ट.

[शार्दूलविक्रीडित]

होती रात्र उजाडलेंहि नव्हतें तेव्हां कुठें एकटा—
जासी, धीट तया दिनीं चिमुकल्या होसी कसा एवढा!
भीती सोडियलीस आणि मजला आईसही ना बरें!
बाळा चित्त तुझ्याविणें बघ कसें हो आज हें घाबरें!
होती एकच भाकरी म्हणुनि मी 'खा तूंच' हें बोललें
'नाहीं नाहिं' म्हणून अर्धि मजला खायास तूं लावलें
तें तें आठवुनीच पोट भरुनी येतां असें राजसा!
मेली भूक! कधीं बघेन तुजला ही भूक आतां मला!
होती काळ दुपार पाय कवळे तान्ह्या तुझे भाजले
'घेतें येइ कडेवरी चिमुकल्या' जेव्हां तुला बोललें
तेव्हां 'पाय तुझेहि पोळति तरी माझेहि पोळोत गे'
जासी बोलुनि आग आज मजला भाजीतसे तीच रे!
झाली आज तुझ्याविणें गति अशी होईल कैशी उद्यां
—ये ये आजच भेट, गोष्ट न कळे बाळा उद्यांची—

२० सप्टेंबर १९२२.

## माझे ग्रह.

[ शार्दूलविक्रीडित.]

जे माझे ग्रह उच्च नीच मिळती त्यांचीं फळें हीं मला
वक्री मार्गि तसेच जीवितपथीं हा खेळ त्यांचा भला!
त्यांची कैद मला अशक्य म्हणुनी तेथून सोडीवणें
त्यांचा कोट समोंवतीं कठिण रे तेथें मला जिंकणें!

२८ सप्टेंबर १९२२.

## नवा शब्द.

[ शार्दूलविक्रीडित.]

बाळें अज्ञ, गरीब लोक न घरीं ज्यांची करीं भाकरी,
पोरांचा कळतो स्वभाव पुरता ते थोर ती वैखरी
कोठेंही मनमोकळे, चतुरहीं स्वातंत्र्य वृत्तीमधें
त्यांचे शब्द नवे सदैव मजला तैशी मजा त्यामधें!
कोणीं सांगितले, कुठें परिशिले, कोठेंतरी वाचिले
केव्हां आयकिले सभेंत तितुके ध्यानीं मनीं राहिले
त्यांची खूप मनास लागुनि सदा अस्वस्थ तें होउनी
नाहीं शब्द नवा तरी न कविता गेलोंच वेडावुनी!
आयुष्यांत यथावकाश पुढती झालों अती घाबरा
उत्कंठा नव शब्द तो परिसण्या घाली मना वागुरा
दैवें कालवशात् तिची सफलता होऊनिया संप्रती
जो तो शब्द नवा नवा मज असा वेडा करी शेवटीं
त्यानें विंधियलें तसेंच म्हणुनी हा वेध माझे मना!
त्यानें जीव दिला जिवास म्हणुनी या संपती यातना!

२ आक्टोबर १९२२.

## वहीची ओळख.

[ एका मित्रास दिलेल्या वहीवर लिहिलेल्या ओळी.]

[ शार्दूलविक्रीडित.]

सांगे किंमत फार अल्प अपुली वस्ताद हा कागद
घेतो मात्र लिहून कोण लिहितो त्याची खरी किंमत
त्याचा जाणसि हा स्वभाव म्हणुनी आशा बुझावी मना
ओजस्वी लिहिशील सुंदर नव्या–स्वत्कल्पना भावना !

२७ सप्टेंबर १९२२.

## ती एकटी !

[ शार्दूलविक्रीडित.]

आशा आणि उषा मनांत गगनीं येऊन एकीसवें
त्यांनाही म्हणती 'चला तर खरे, कां गाळितां आंसवें ?'
'तारू येइल तें तुम्हांस तुमचें भेटेल कोणीतरी,'
लाटा उंच उचंबळून जमती येती किनाऱ्यावरी !
तेंव्हां शीड दुरून पाहुनि किती हो हर्ष सर्वांप्रती
आलें तारु–परंतु ना उतरलें तेथें कुणाचें कुणी
गेली लाट–तशीच सर्व–निघुनी; कोणीतरी एकटी
राहे स्तब्ध पहात खोल अगदीं त्या खोल सिंधूतटीं !
आलें तारु दुजे दिनीं–कुणि तसें–आनंद झाला कुणा !
वार्ता दुःखद सांगती तिजमुळें हो शोक भारी कुणा !
आली लाट सळाळुनी–परतलीं सारीं घरीं यावया
राहे एकटि ती कळे न कसल्या ठावास घेणें तिला !
तारू नाहिं तिजे दिनीं–उसळती विक्राळ लाटा अती !
होत्या त्या इतक्या भयाण– दिसली कोठें न ती एकटी !

१ आक्टोबर १९२२.

## दसऱ्याचें सोनें.

[ शार्दूलविक्रीडित.]

सोनें—आणि खुशाल वांटुनि दिलें भेटेल त्याला तिथें ?
श्रीमंती कुठली ? उदार इतुके कां आज पूर्वी न ते ?
"वाहावा दसरा अहो विसरलां कीं काय हा आजचा
सोन्याचा दिन हा पहा विपुल हें सोनें समारंभ हा !"
कोणाचे कवणे दिनीं उघडतें प्रारब्ध हें नाकळे
येतो हा दसरा सुवर्णपदवी पानांस तेव्हां मिळे
जाणा मात्र मनांत, आजहि जरी हें न्याल पेठेमधीं
फेकूनीच सराफ साफ अगदीं देईल केरामधीं !
हें सोनें—बहिणीस, घाल तिजला याचीच ओवाळणी
हें सोनें—जननीस, हें प्रभुसही वाहा नमस्कारुनी
भावावांचुनि भाव यास न कुठें मैत्री कसोटी खरी
तेथें मात्र अमोल, मोल इतुकें—पानास सोनें करी !
—श्रीमंती कमती पडेल अथवा औदार्य आटेल ही—
भीती काय म्हणून ? प्रीति करितां सोनेंच पानासही !

३ आक्टोबर १९२२.

## तात्पर्य.

[ शार्दूलविक्रीडित.]

तात्पर्यें अनिवार जीं अनुभवा आलीं पुढें येतिल
ही आयु:सरिता तशींच वळणें घेऊनिया जाइल
दु:खाला अथवा सुखास मिळुनी जाणार, हें नाकळे
हें तात्पर्य म्हणून कीं, मरण हें आहे बरें—चांगलें !

९ आक्टोबर १९२२.

## पर्वतीचें तळें.

[चाल—अंबरगत परि]

हिराबाग गोजिरी, पर्वतीवरी झडति चौघडे
तळें हें मात्र मधें कोरडें!

सांग, हरवले असे किती तव हिरे, हिरा यामधीं
तयांच्या लोभें ही दुर्गती!

वनवासी भिल्लीण पर्वती अरसिक हा आरसा
पदानें फोडुनि टाकी असा!

मराठियाच्या देहावरती कांटा राही उभा!
खालसा ऐश्वर्याचा सुभा!

भाऊस्तव नाना रडला—तें आटलें!
गुज महादजीचें ओसरलें— वाळलें!
पाणीच पुण्याचें जणुं सारें संपलें!

सारस पक्षी सारसबागेमधीं कुठें नाढळे!
घुबडें अशुभ काढिती गळे!

९ आक्टोबर १९२२.

## दोघांसही.

[शार्दूलविक्रीडित.]

हिंदुस्थान अशस्त्र, दुर्बल किती, झाला दरिद्री तरी
भाषा धर्म अनेक पंथ म्हणुनी भेदून गेला तरी
"हिंदुस्थान मदीय आणि दुरवस्था ही" असें अंतरीं
जें आतां दुखतें न देइल सुखें तें झोंप दोघांसही!

२५ आक्टोबर १९२२.

## काळनदीवर.

[शार्दूलविक्रीडित.]

वाहे काळनदी तिच्या निकट तें काळीज खेडें वसे
जाणों कोकणचें लहान उडतें काळीजची तें असे!
त्याची कीर्ति–'नदीस पूर भरुनी ती एक घेते बळी
सालोसाल असें घडे, न चुकलें केव्हां अजूनी मुळीं'

त्या गांवीं घरदार, दूर पण तो होता शिपाई कुठें
त्याची ती हृदयांतली, पण दुरी होती घराचेकडे
वारंवार परंतु पत्र मिळुनी होऊन सारी सई
सौख्याशेंत किती असूं जवळ; हें–हें वेड दोघांसही!
नाहीं पत्र, म्हणून पत्र निगुतें तीनें तया धाडिलें
नाहीं पत्र तरी–पुन्हां उलट तें आलें करीं मागुतें
वार्ता त्या मग एक एक उठल्या; ये पूर वाहे नदी
वाहे कोण? नदी कशास बघते वाहील कोणी तरी!

आलें पत्र तसेंच तें परतलें गेलें तयाचे करीं
आला तो–पण दूर दूर अगदीं गेलाहि कोठें तरी!

१४ आक्टोबर १९२२.

## दाराची कडी.

[दिंडी.]

'पाप नसलें तरि लाज नको कांहीं?
जरी जाणे जग तरी गुप्त कांहीं!'
शब्द कोणाचे कुठुनि हे हळूच?
कडी दाराची वाजली हळूच!

१५ आक्टोबर १९२२.

# करुणा.

[ दिंडी. ]

विमल कीर्तीचें शुभ्र वस्त्र ल्याली
वस्त्र ल्याली तें व्रताहुनी पाळी
दृष्टि पायीं लागेल कुणा पाय
म्हणुनि पडतो किति मंद मृदु अपाप!

नीट वाटेनें कडेनें रितीनें
चालणें तें धूलीस होय लेणें!
फूल पडलेलें पाय त्या न लागे
चिखल तेथें पाऊल भिउनि वागे!

अचल अंचल, चंचला वायुवीची
वृत्ति धरुनी जातात नम्रतेची!
मार्ग म्हणतो मी जाहलों पुनीत
देव बोले ही भक्ति मूर्तिमंत!

कल्पना त्या—कुणिकडे लया गेल्या!
भावना त्या—अति शुद्ध—शुद्ध झाल्या!
हीच पुण्याई मला चालवीते
अभिनिवेशें जग सांगतें जगातें!

पहा आतां तें रूप जरी डोळे
परी डोळे तत्क्षणीं भरुनि आले!
—आणि करुणा पाहिली ती महान
कुंकुमाविण अरुणता उदासीन!

२२ आक्टोबर १९२२.

## फूल आणि उदकाडी.

[ दिंडी ]

फूल देवाचें, नसे त्यास तोड
उमलतें मग, आधींच वास गोड
—ऊदकाडी ही आपुली जळेल
तदा कोठें सौगंध दरवळेल !

८ नोव्हेंबर १९२२.

## सोनचांफ्यास.

[ शार्दूलविक्रीडित.]

भृंगानें अवमानिलें मधुमिषें कीं तो बुभुक्षू असे
वासाची रुचि काय त्या अरसिका त्याची चवी त्या नसे
जेव्हां म्यां रसिकें म्हणून इतुकें तूतें करीं घेतलें
तों हा दर्प तुझा असह्य ! तुजला भुंग्या वृथा निंदिलें !

८ नोव्हेंबर १९२२.

## चित्र.

[ शार्दूलविक्रीडित.]

दृष्टिक्षेप तसाच आज बघतो चोहींकडे वाटतें
चर्या तीच स्वभाव तोच समयीं अस्तित्व तें भासतें
होतो हर्ष परी विषाद उपजे 'प्रत्यक्ष तें दुर्लभ !
ऐसें चित्र विचित्र दुर्लभ, तरी दूरावलें दुर्लभ !

## मित्रा,

[ चाल–सुकुमार असुनि.]

अंधार
घोर चौफेर
भरे भय फार
ये उदया मित्रा करीं प्रतापें दूर !

बेसूर
आणि भेसूर
सर्वथा क्रूर
श्वापदें इथें हीं, फेंक तीव्र कर–तीर !

आगमें
तुझ्या संगमें
शुभोदयकाळीं
हें सहस्रदल उमलुं दे फुटोनी उकळी !

कोंडला
भृंग मोकळा
तुजमुळें झाला
हें कसें असो जग नसें. भीत मी त्याला !

आरक्त
पूर्ण अनुरक्त
गुणाचा भक्त
तूं मित्र मुदें चंडोल स्वैर हा गात !

१३ नोव्हेंबर १९२२.

## अरुण-जन्म

अथवा

## स्वातंत्र्यासाठीं प्रयत्न.

[ दिंडी ]

—म्हणुनि अगदीं मन जाहलें उदास
आस नाहीं, घेतला जिवें त्रास
कुणी नाहीं आपला पक्षपाती
म्हणुनि पंखांची आटपली शक्ती !

तशी उठुनी हतभागि घरा आली
आणि दारीं तेथेंच बसुनि ठेली !
जशी चुकुनी परकिया घरा आली
अशी घरिंही चोरीच तिला झाली !

'दुष्ट दास्यांतुनि कधीं सुटायाचा
नसे ज्यामाजी दिवस यावयाचा
व्यर्थ असलें आयुष्य काय होय
मरण उत्तम हा एकला उपाय !'

क्षणीं अंगीं बळ नवें कुठुनि आलें
ऊब आली पंखही सज्ज झाले
तोंच येउनि मनिं परतली घरातें
'बाळ टाकोनी निर्दय मी जातें'

येइ विनता माउली पिलांपाशीं
जीव जीवाचा असा प्रेमपाशीं !
बघे—बोले 'हें कवच फुटायाचें
काय तेणें नच दैन्य फिटायाचें ?'

'दैन्य जायाला काय मग उशीर'
तोंच पडली वर चोंच ती अधीर !
कवच फुटलें—पांगळा अरुण झाला !
'काय आतां ?' जप फार या दुज्याला !

१५ नोव्हेंबर १९२२.

## —साठीं आणलेलीं फुलें.

[शार्दूलविक्रीडित.]

गेलीं सर्व सुमें सुकून तुज जीं द्यायास मीं आणिलीं
तूं आहेस दुरी तरी स्मृति तुझी पोडा अशी विस्मृति !
हा निर्माल्य असा पुनःपुनरपी वेडयापरी हुंगिता
येती आठवणी किती !—मनहि हें कोमेजतें तेधवां !

२८ डिसेंबर १९२२.

## एक ग्रंथ.

[ शार्दूलविक्रीडित]

आहे ग्रंथ असंख्य, अंक न तिथें एकाहि पानावरी
आधीं एकहि पान हालत नसे जों एक आहे करीं
पानें मागिल फाटलीं पुढिल तों लीपी नये वाचितां
ज्याला एकच पान—ग्रंथ असला हा सर्वथा तत्त्वतां !

सारे साक्षर ते निरक्षरहि ते विद्वान् अविद्वान् तसे
हें आश्चर्य नसे— पशू, नरपशू, निर्जीव सारे कसे ?
—जी जी येत लिपी तयांत लिहिती ग्रंथास ते आपल्या
शाईचे तर रंग ते कितितरी नानापरी लेखण्या !

चालें लेखन तें प्रकाशन सवें नाहीं मुळीं अंतर
शुद्धाशुद्ध तसेंच, व्यर्थ कळुनी, तीं अक्षरें अक्षर
जें येईल मनास मोल तितुकें देऊन हो मोकळा
जेथें आणि जसा तसाच अगदीं तो ग्रंथ आटोपला !

१ जानेवारी १९२३.

## एक बेत.

[शार्दूलविक्रीडित.]

जा-ये सांजसकाळ नित्य करते त्या त्या प्रसन्नेक्षणें !
पुष्पें कोमल गोड आणि हंसरीं त्यांचीं तदा आननें !
—आहों आपण दूर दूर इतुकें नाहीं तया ठाउकें
यासाठीं मनिं बेत—चोज पुरवूं त्यांचें तदा कौतुकें !

# तशी ती रूपानें सुरेख नाहीं!

[ कोल्‌रिजच्या 'She is not fair' या कवितेच्या आधारानें ]

[ दिंडी. ]

नसे रूपानें ती तशी सुरेख
जशा रूपवती चमकती अनेक!
तिची मोहकता नव्हति मला ठावी
जोंवरी तें स्मितहास्य मला दावी!

अहाहा तें नेत्रिंचें तिच्या पाणी
हर्षनिर्झर कीं प्रीति त्या निधानीं!
—तरी लाजाळू स्तिमित सदा आतां
कधीं नाहीं बोलली 'न्यून' शब्दा!

—आणि जरि मी सारखा लुटित आहें
तरी पहिली ती प्रीति मला लाहे!
तिचें लज्जान्वित मुकुल नम्र आस्य
अप्सरांचें त्यापुढें तुच्छ हास्य!

५ जानेवारी १९२३.

# विचार आणि विकार.

[ दिंडी. ]

उन्हाळा हा तुज पाहिजे निवारा!
हिंवाळा हा मज पाहिजे निखारा!
सुस्थिती ही तुज सूचतो विचार!
दुःस्थिती ही मज बोचतो विकार!

९ जानेवारी १९२३.

# चार वर्षांच्या मुलीची गोष्ट.

[ दिंडी. ]

चार वर्षांची चिमुकल्या मनाची–
बालिका, तिज कळणार गोष्ट कैंची !
तरी इतुकें तिज कळुनि मात्र आलें
'पुन्हां आईनें कुंकु लावियेलें !'

–'आणि लोकाच्या घरीं रहायाला
इथें आलों' नच चैन तन्मनाला
द्वाड तीचें मन कधींही कशानें
लाड करितांही हंसेना सुखानें !

माय सांगे–'जा आण बोलवून
तदा संबोधन मात्र ओवळून
बोलवीते ती अचुक, हें बघून
तिच्या आज्ञानें जाय ती भिऊन !

घरीं बाबा आहेत का तुझे गे ?
असें कोणी तिज पुसे सहज, वेगें
तों वदे ती–'हें नव्हे घर तयांचें
नसति बाबा त्या घरांतही माझे !

एक दिवशीं तो घोर ताप आला
दूर आई क्षण,–आणि त्या क्षणाला
'तुम्ही बाबा ध्या मला' असें बोले
–आणि मुलिला आपल्या तयें नेलें !

६ जानेवारी १९२३.

## नदी आणि मानिनी.

[चाल—तेथेंच उभी कीं आलें.]

एकटी बापुडी जाई   सरिते मज येणें नाहीं—यापुढें
ओलांडुनि डोंगर तीन   झालें तुज सांगातीण—इथवरी
सोडुनिया आढेवेढे   अनुसरलें वळसे वेढे—तुजसवें
यापुढें। मनीं मी कुढें। एकटी पुढें
तुझी तूं जाई। इतुकी भोळी नाहीं—साजणी!
प्रीतीचा सागर तूझा   कुणिकडे मारितो मौजा—साजणी!
धरुनिया तयाचें ध्यान   करुनिया जिवाचें रान—साजणी!
जातेस त्यास शोधाया   आहे का परि त्या माया—साजणी!
भाबडी। करुनि तांतडी। टाकुनी उडी
धांवही घेसी। दाद ना याद परि त्यासी—निर्दया!
प्रीतिची अशी का रीत?   ही एकेरी नयनीत—मज नको
अंतरें जुळायासाठीं   अंतरें तुटायासाठीं—झडकरी
शोधावें दोघांनींही   धांवावें दोघांनींही—सन्मुखीं
मानिनी। असें बोलुनी। वळे त्याक्षणीं
विसरली भान। घेतली धाव मोहून—नदिपुढें!

२५ जानेवारी १९२३.

## वियुक्ताचे उद्गार.

[दिंडी.]

[१]

नयन माझे आंधळे पाहवेना
हात झाला जड मुळीं हालवेना
हृदय माझें चोरिलें पाहताहें
खुणा साऱ्या मम मनीं शोधिताहें!

[ २ ]

हृदयिं माझ्या तूं जरी राहिलीस
मनहि माझें तू जरी वेधलेंस
तरी केव्हां पाहीन लोचनांनीं ?
आणि कवळिन केधवां या करांनीं ?

१७ जानेवारी १९२३.

## झोंपडी आणि संध्याकाळ.

[ शार्दूलविक्रीडित ]

कोणाची गरिबी पडेल उघडी रानामधें बापुडी
यासाठीं कनवाळु माउलि तशी होती उभी झोंपडी !
होतें दार लहानसें लकटलें—नांवास तें लाविलें
त्या दारिद्र्यधनास निर्भयपणें राखीत कीं राहिलें !

वारा पाउस शीत यांस अगदीं तेथें निवारा असे
त्यांसाठीं धनि तेथला कुडकुडे, तापे बिचारा भिजे !
होतें काय तयास त्यांत सुखे हें दुःखास त्या ठाउकें
ज्याचें त्यास किती किती अवडतें, लोकांस तें वाउगें !

हें माझें घर यावरून सगळ्या पृथ्वीस ओवाळितों
याबाहेर जगांत दुःख सगळें, येथेंच आनंद तो !
जें मातें मिळतें उरोनि पुरतें तें हेंच माझें घर
धावे यापरि चित्त—आणि म्हणुनी येतो कुणी सत्वर !

—संध्याकाळ असाच चुंबक जिवा गेहाकडे ओढितो
संध्याकाळ परीस कष्ट सगळे सोनें असें दावितो !

२१ जानेवारी १९२३.

## तुमच्यासाठीं.

ज्यानें भाव स्वभाव हाच अपुला नेता जगीं मानिला
सर्वांहून दुरून मार्ग अपुला–वेडा म्हणा–काढिला
निंदा स्तोत्र तयास तुच्छ तुमचें, विश्वास त्याचा स्थिर
–सांभाळा अपुल्या कलाकुसरि त्या सोडाल नाहींतर!

## आई आणि देव.

[ दिंडी ]

"असें सुंदर घर आपुलें असून
कसे आपण राहतों हीन दीन
लबाडांचा उत्कर्ष जगीं आई?"
'नाहिं बाळा रे देव असे न्यायी'
"दुर्दशा ही मन होतसे निराश
निराशेचें विष, गतप्राण हर्ष
कशा बहुविध आपदा या पिटाळूं?"
'बाळ आहे रे देव तो दयाळू'
"अशी दुबळिक मस्तकीं गदा घाली
जाणिवेची सारखी आग जाळी
उदासाची भवितव्यता कपाळीं"
'बाळ आहे रे देव तुझा वाली'

६ फेब्रुवारी १९२३.

## घड्याळापाशीं दोन शब्द.

तूं निर्जीव, कमान कोण अडुनी हट्टी पिळानें भरे
–तीसाठीं टिकटीक आणि नसता हा जीव तूझा झुरे!
मी जीवंत, इमान पीळ भरुनी माझ्या जिवा बैसतां
केलें नाहिं अकांडतांडव तरी चैतन्य नाहीं वृथा?

## तुझ्याविषयीं.

[ शार्दूलविक्रीडित ]

संतापाहुनि दूर वृक्ष अपुली सांभाळितो सांवली.
ठेवी सागर शांति, शीतल अशा रत्नोत्सवा हृत्स्थळीं.
दुःखापासुनि दूर त्यापरि तुला ठेवीन–मी साहिन
होतो त्रास तरी तुझ्याच विषयीं कोपे न माझें मन!

२३ फेब्रुवारी १९२३.

## गिळलेला अश्रु.

[ शार्दूलविक्रीडित ]

तेव्हां दुःखहि जाहलें सुख कसें, हें सारखें आठवे!
हें कां सौख्य कठोर? अर्थ न कळे, चित्तास ना सोसवे!
याचा काय विचार तूं ठरविला, कैसें विचारूं तुला?
आला अश्रु असा गिळून बसतां हा कंठही दाटला!

६ एप्रिल १९२३.

## अनिवारपणानें–

[ चाल–भूपती खरें तें. ]

अनिवारपणानें गोष्टि किती घडतात!
अनिवारपणानें मनीं सदा सलतात!
वाईट वाटलें तरि तेंही अनिवार!
जरि रडें कोसळे तरि तेंही अनिवार!
निरुपाय एकटा करील तो उपचार!
ज्या थरावरी जें जाई तोच उतार!
सुख कधींच गेलें दुःखहि आतां सोड!
ही उदासवृत्ती अनिवार असे तोड!

२२ एप्रिल १९२३.

# शाळेंत जातांना—

[दिंडी]

पांच पैशांचें पुस्तकहि महाग
असा अपुला निष्ठूर दैवयोग
'काय त्याचें तरि' म्हणूनी मनांत
माय बाळाच्या देइ तें करांत.

दहा पैशांची लहानशी पाटी
कष्ट केले बांधून वस्त्र पोटीं
'काय त्याचें पण' म्हणूनी मनांत
माय बाळाच्या देइ ती करांत.

पेणसलही ती दुधी आवडीची
दीडदमडीची—धोंड काळजीची
हृदय अपुलें ठेवून असें तींत
माय ठेवी ती मुलाच्या खिशांत.

'पुस्तकाला जप नको हरवुं—फाडूं
पेणसलिला पाटिला नको फोडूं
लक्ष लावोनी ऐक शिकवणीला
शीक लौकर लिहिण्यास वाचण्याला.'

शीक लौकर लिहिण्यास वाचण्याला
माय सांगे तुज बजावून बाळा
लिही हातानें वाच तें मुखानें
अर्थ आईचा समज तो मनानें !

२२ एप्रिल १९२३.

## फुलांचा राग करूं नको !

What has been done, don't do over again"

[श्लोक.]

पुरे, एक जें फूल गेलें चुरून
नको पाप घेऊं पुन्हां तें करून !
तुला ना कुणाला फुलें हासतात
स्वभावें बिचारीं मजेनें सुखांत !

तयांचा वृथा राग कां त्वां करावा ?
तयांचा तुला हर्ष तो कां नसावा ?
सुवासा तयांच्या नको दर्प मानूं
गुणाला नको दोषरूपास आणूं !

पहा सूर्य अस्तास जाया निघाला
अहा फूल कोमेजलें रंग गेला !
स्वभावें असें जाय जें कोमजून
विषादें नको त्यास टाकूं चुरून !

२७ एप्रिल १९२३.

## होवो, पण होऊं नये.

[शार्दूलविक्रीडित]

चित्ताला पटलें परी न वठलें कांहीं कृतीनें कधीं !
डोळ्याला दिसलें परी न धरलें केव्हांच हातामधीं !
केव्हां दुर्बलता कधीं भ्रम करो आयुष्य सारें वृथा
श्रेष्ठांचा अवमान उद्धतपणें होऊं नये एकदां !

१८ जून १९२३.

## जलभरण.

[ वियोगिनी ]

अवगुंठन तें मुखावरी
तरि दृष्टीस समुत्सुका करी
मृदु सुंदर देह झांकला
लपली नाहिं मनोहरा कला !
तनुला कुशला लतेपरी
वसनें वेढियलें वरीवरी
म्हणुनी सुभगांगचारुता
खुलते आश्वसितां तरू लता !
जलकुंभ शिरीं विराजला
कर डावा धरितां उभारिला
परि तोंचि अपांग जाहलें
वसनाच्छादन सावधानलें !
पद कोमल पद्म शोभतें
वरि गुंजारव पैंजणी नुदे
चपला लपली क्षणामधें
जल किंवा मृग-नीर नेइ ते ?

१ मे १९२३.

## मोहनमाळ.

[ दिंडी ]

कृष्णकेशीं गुंतला भांग मोहें
गौरमुख हें आरक्त तिलक लाहे.
हृदय मोहनमाळेस तूं दिलेंस.
तुला कळतें ?—ती मोहिते कुणास ?

२८ जुलै १९२३.

# नेपोलिअन आणि न्यूटन.

[उपजाति]

भ्याले मनीं वीर अ-धीर झाले
आहों कमी आपण ते म्हणाले
'नसों कमी आपण–सर्व तुम्ही
लाखास भारी वर एकटा मी' !

तत्काल भीती अवघी निमाली
तत्काल शस्त्रावरि धार आली
जेता खरा तो जगिं अद्वितीय
तो दर्पही त्यास नसे अयोग्य !

घेऊनि हातीं कण वाळुकेचा
मित्रास बोले अति नम्र वाचा
'विश्वांत जें ज्ञान भरून आहे
तदंश माझा इतुकाहि नोहे.'

विद्येपुढें बुद्धि अपूर्ण आहे
जन्मांत तीचा कण एक लाहे
ज्ञाता खरा तो जगिं अद्वितीय
विनम्रता शोभुनि त्यास जाय !

२४ जून १९२३.

# वर्षाकाल.

[ श्लोक ]

मोठेंच हें नवल कीं, दिनराज दीन–
झाला निबद्धकर आणि प्रतापहीन!
संतप्त लोक उठुनी जणुं राजयाला
ते घेरिती म्हणुनि निष्प्रभ तो जहाला?

स्वैर वारु सुटला पवनाचा
घाबरा जिव करीत घनाचा
हापटे, गडगडाट तयाचा
घर्मपूर नच पाउस साचा!

किंचाळली वीज असें बघून
आकाश गेलें हृदयीं फुटून!
तयांतुनी स्वर्ग जरा दिसून
गेली पहा ही धरणी खुलून!

चोहींकडे जीवन वाहताहे!
सारीकडे जीवन गर्जताहे!
रानीं वनीं पाच सवंग झाली!
स्वयंभु शृंगार धरा लिआली!

१६ जुलै १९२३.

## आशा आणि अनुभव.

[शार्दूलविक्रीडित]

आशा होति उभीच किंचित दुरी ती घेउनी संनिध
संधी साधुनि एकदां अनुभवें संबोधिलें ‘ लाडके—
आला दाटुनि कंठ ऊर्मि उठुनी चित्तांत नानाविध
‘ आशे काय वदूं तुला जिवलगे ’ बोले असें थोडकें

‘ आशे, सौख्य तुला नसे–पण पुढें आशाहि कांहीं नसे
आहे हा सहवास त्रास सगळा तूंतें सदा कोमले !
मी कंगाल, तशी तुला बनविली जा सोड याला कसें
कां ऐसा वनवास काढिसि उगा तूं राजसे-प्रेमले ? ’

कांहीं निश्चय मानसीं करुनिया आशा क्षणीं बोलली
“ नाथा मी दुहिता कुलीन इतुकी ही गोष्ट मी सांगतें.
जन्मापासुनचीं सुखें विसरल्यें हीं दूर मीं फेकिलीं
घ्या आतां जवळी कधींहि असलें बोलूं नये मागुतें. ”

‘ आशा हीच खरी मदीय, असली आशा कुणाला नको ? ’
“ आशा मी अपुली प्रभो अनुभवा, अव्हेर तीचा नको ! ”

१८ जुलै १९२३.

## भैरवी.

[ चाल–प्रभो पूजा ही. ]

असा राजा या लोकीं प्रभु एक झाला
जो सदा करुणाबळें । परिपाळितो मुलें
असुख हारितो । विहित करितो । करहि पुरतो
नमन त्याला ॥ १ ॥

# किंचित् नवल.

[ दिंडी. ]

चिन्ह नव्हतें पाऊस पडायाचें
दिवस जरि हे आहेत पावसाचे
समय संध्याकाळचा फिरायाचा
मैत्रिणीसह गमतिनें जावयाचा !

'हवें छत्रीचें लोढणें कशाला
आणि आला पाऊस तरी आला'
एकमेकिस बोलून असें धीट
फिरायाची त्या सुधारिती वाट !

शिक्षणाचा हव्यास मनीं भारी
चालचलणुक ती तशी नवी सारी
रूप अपुलें जणुं सुधारणा दावी
प्रौढताही ती अल्पवयी व्हावी !

असो, फिरणें संपून घरीं येतां
पदर त्यांनीं घेतला असे माथां
पडत होता पाऊस जरासाच
नवल किंचित तें वाटलें उगीच !

जुन्या बाया देवास नित्य जाती
नित्य येतांना अशा भिजत येती
काय कारण तें नवल वाटण्याचें ?
काय कारण हें नवल वाटण्याचें ?

२३ जुलै १९२३.

## प्रवासी.

[ चाल—जगाचे बंध कोणाला ]

प्रवासी मी तुझ्यासाठीं—तुझ्यासाठीं—तुझ्यासाठीं
धरोनी आस ही काठी जिवाला सांगतों गोष्टी.
नदीचा ओघ हा खालीं, मनाला घालितो भीती
तरी मी चाललों आहें तुझ्यासाठीं उभी घाटी.
तुझी माझी अशी प्रीती बघोनी हा पहा कांटा—
अहा! सह्याद्रीच्या देहीं, उभाही वांकुडा वेडा!
घुमे वारा भरारा हा चळेना हा जसा योगी
तुझें वारें मनीं माझ्या फिरे मी प्रेमबैरागी!
—जरी वर्षें पुरीं बारा वियोगीं आपुलीं गेलीं
स्थिती ती आज, हें कैसें घडावें धावत्या काळीं!
स्थिती कैशी असो, प्रीती मला जी ओढिते वेगें
तिच्यासाठीं—तुझ्यासाठीं असा मी चाललों मागें!
—कुमारी ती—तशी गेली!—अहा! मन्नाम त्या ओष्ठीं
प्रवासी मी पुढें आतां जगापाठीं कुणासाठीं?

१८ आगष्ट १९२२.

# दुःखाची कहाणी.

[ दिंडी.]

असे श्रावणमास हा कहाणीचा
समय साधुनि उपलब्ध पर्वणीचा
कथित आहें मी आपुली कहाणी
होउ आवडती नावडती राणी !

शहर, खेडें, वन, भवन सर्व ठाणीं
एक काळीं सर्वत्र राजधानी !
राज्य माझें हें आवघ्या जगाचें
सकल सौख्यीं मी; 'दुःख' नाम माझें !

निराशेनें व्याकूल चित्त झालें
किती अनुभव कटु तेच-तेच आले
प्रेम आणिक सुख सोडुनिया गेलें
—-कधीं त्याला मीं नाहिं उपेक्षीलें !

दिला त्यानें मज आसरा घरांत
मींहि केलें घर त्याचिया मनांत
स्थूल माझेहुनि जगीं कुणी नाहीं
सूक्ष्म माझेहुनि जगीं कुणी नाहीं !

बरें वाइट सर्वांस कळायास
सोशितों मी सर्वदा किती त्रास
कुणी माझे उपकार मानितात
कुणी नांवें रडतात अहोरात !

श्रावणी पौर्णिमा शके १८४५.

## भावना आणि कल्पना.

[ शार्दूलविक्रीडित.]

संध्याकाळ म्हणून पुष्प गळलें; कोमेजली भावना
आकाशीं तंव तारका उगवल्या; उल्हासली कल्पना
दुःखें, दुर्लभता, जरा, मरण हीं येथें तिला भेटलीं
सौख्यें, कल्पलता, सुधा, अमरता स्वर्गीं तिला लाभलीं !

नाहीं पंख म्हणून भूमि धरुनी ती बापुडी राहिली
भूतापासुनि वर्तमान इतुक्या रेषेमधें नाडली !
तीनें मात्र भरार दूर उडुनी आकाशही फोडिलें
व्यापोनी सगळा भविष्य अपुलें साम्राज्य संस्थापिलें !

संसारांत पडून दुःख–सुखही–सोसून नानापरी
झाली वृत्ति उदास आणि हळवी दृष्टी सदा बावरी
श्रद्धा आणि पवित्रता सहचरी गंभीरता घेउनी
टाकी व्याकुल आणि कोमल पदें संक्षुब्ध मार्गांतुनी

–'ताई, मी न तुझी बहीण?' सहजीं तेव्हां वदे कल्पना !
"राही नित्य सुखांत तूं" गहिंवरें बोले तदा भावना !

२९ आगष्ट १९२३.

## देवदर्शन.

[शार्दूलविक्रीडित.]

आहे काय पवित्र मंगल असें कर्तव्य हातामधें?
आहे काय सदैव पाउल तुझें त्या सत्यमार्गामधें?
आहे काय पहा सुधा सरळसा हेतू मनाचेपुढें
आहे हें तर देवदर्शन तुला होईल डोळ्यापुढें !

३० आगष्ट १९२३.

# पक्षी आणि सुगंध.

[चाल—सुकुमार.]

तोडुनी
बंधनें जुनीं
क्षणावसरांत
जायास निघाला पक्षी स्वैर जगांत!
साउली
मनीं कष्टली,
कोवळीं पानें
थरथरलीं हृदयीं जशीं तशीं देहानें!
परि सर्व—
उपेक्षुनि, गर्व—
धरुनि पंखांचा
गेलाच ध्यावया ठाव उंच गगनाचा.
आकाश
अमित अवकाश
भागला पक्षी
उतरून दूरच्या तरुच्या बसला शीर्षीं.
—तेधवां
वायु ये नवा
सुवासें भरला
पक्ष्यास अंतरीं अनुभव कांहीं पटला.
त्यामुळें
होय मन खुलें
—आणि झणि आला
आगमनें त्याच्या आनंदित तरु झाला!

२१ आक्टोबर १९२३.

## तुझें प्रतिबिंब.

[ शार्दूलविक्रीडित. ]

कासारीं प्रतिबिंब सुंदर तुझें तूं कौतुकें पाहुनी
आनंदून मनांत गेलिस किती मीं तेधवां पाहिलें
जेव्हां चित्र असें हुबेहुब तुझें दृष्टी पडे जीवनीं
आपोआप उगाच जीवन तुला तें वाटलें आपुलें.

गेहा जाउनि मुक्त केश मुकुरीं पाहूनि ते बांधितां
त्यांचें पूजन रम्यपुष्परचनें संपूर्ण केल्यावरी
कंठीं मोहनमाळ कुंकुम तसें भालावरी रेखितां
तें संफुल्ल मुखाब्ज रम्य मुकुरीं त्वां वाहिलें सुंदरी,

—जातां दूर क्षणीं तुला विसरतो तो आसरा तें जल
देती चित्र तुझें सुरेख इतुकें कोठेंतरी फेकुनी
आहे काय परी तुला विदित तें कोठें असे निश्चल?
या माझ्या हृदयांत मात्र सखये, आहे सदा बिंबुनी.

—तूं येतां जवळीं क्षणांत मग मी टाकीन तें भंगुनी
हे आभास कशास राहिन सुखें प्रत्यक्ष आलिंगुनी!

२४ आक्टोबर १९२३.

# माझा आवडता दगड.

[श्लोक]

तीरावरी उंच अशा धशीला
पाषाण तो निश्चल शांत ठेला !
वाटे, कुणी पांथ उशीवरी या
निद्रा करी मस्तक ठेवुनीया.

अखंड खाळून नदी वहाते
जागा न हा होय तिच्याहि नादें
'मी चाललों भेट पुन्हां न' ओघ
बोले परी तें सगळेंहि मोघ.

पानें फुलें वाहुनि रोज ताजीं
झाडें कराया झटतात राजी
त्यांचा तयाला परि गंध नाहीं
सुकून जातात फुलें सदाही.

पक्षी किती मंजुल गीत गाती
याला नसे ती तिळमात्र गोडी
हाले–डुलेना क्षणमात्र अंग
म्हणेल कोणी–'नच अंतरंग.'

व्यापार जे भोंवतिं चाललेले
ते सर्व तूंतें अगदीं निमाले
म्हणून येथें दगडा ! बसून
गाणीं लिहाया मन हें प्रसन्न.

२१ आक्टोबर १९२३.

# आमची सोनी.

[दिंडी.]

मृदुल इतुकी नच मना बोचणारी
प्रबल इतुकी दृढ पाश घालणारी
नवल मोठें आनंद तींत पूर्ण
अशी आज्ञा ओळखा करिल कोण ?

मुकुल कलिकेपरि गाल ते फुगीर
राग उसना सांचला जणुं अधीर !
तरल आशाकुल साश्रु दृष्टिपात
रंगवीतो अनुराग क्षणार्धांत !

रुष्ट उत्सुकता उघडुनी मुखातें
म्हणे—'मजला ने आज फिरायातें'
माझि भारी लाडकी सोनुबाई
असा साधा अनिवार हट्ट घेई !

'नको' म्हटलें क्षणमात्र, अश्रु आले
'बरें नेतों' म्हणतांच कुठें गेले !
शब्द केवळ बदलतां मनाजोगी—
सृष्टि बाळांची, आमुची अभागी !

झणीं हातांनीं केश सावरून
रुसुनि पाहुनि मनमोकळें हंसून
चोळिपरकर नेसली थाटमाट—
विचारीतां तो काय, पहा ऐट !

३ नोव्हेंबर १९२३.

## कधींकाळीं—

[ शिखरिणी. ]

अपेक्षेचा आहे अनुभव कटु संतत जनीं !
उपेक्षेचा आहे अनुभव परी गोड भुवनीं !
झटे जो संतोषा अनवरत तो कोण कुठला !
तयाच्या आस्थेला अनुभवहि हाहा ! विसरला !
मनामाजी माझ्या म्हणुनिच पहा खेद न लपे
घडे त्याला राजी असुनिहि असें चित्त विलपे
—वदेना ही वाणी हृदय परि हें मात्र भरतें
कधींकाळीं माझें स्मरणचि करो व्यक्त पुरतें !

६ नोव्हेंबर १९२३.

## वाढदिवसाचें हृद्गत.

[ शार्दूलविक्रीडित. ]

इच्छा, बुद्धि, प्रयत्न, शक्ति अपुलें सर्वस्व मीं वाहिलें
काळाला–स्थितिला; उणेंच सगळें प्रत्यक्ष हें पाहिलें
नैराश्यांतिल वाढ–वाढ कसली ! कापीत जीवास जी
माझी सर्वपरी सदैव असुं दे देवा, तुला काळजी.

७ डिसेंबर १९२३.

# स्मृति.

[दिंडी.]

सखा अनुभव तो आज कुठें गेला
जीव स्मृतिचा व्याकूळ फार झाला !
बसुनि दारीं कर ठेवुनिया भालीं
वाट बघतां पातले अश्रु गालीं !

वियोगाचा सुमुहूर्त नियोजून
ब्रह्मदेवा म्हटलेंस सावधान
गांठ पडली, घडली न पुन्हा भेट
दुष्ट नाहीं का हें असें ललाट ?

चक्रवाकीला रात्रिचा वियोग
दिवसरात्री मज दोन्हिही कुयोग !
कुठें दयिता, गेलांत असे दूर
कसा अनुभव मम जाहला कठोर !

—परी नाहीं—नाहींस तूं कठोर
हृदयपटिंचे तव लेख किति उदार !
किती वाचूं सारखे सारखे हे—
वाचतांना हा जीव तुटत आहे !

—पुढें मरणाची वाट बघत ठेली
अनुभवाची तों स्वारि कुठुनि आली
कलेवर तें राहिलें करामाजीं
जीव गेला बिलगून जिवामाजीं !

५ डिसेंबर १९२३.

## मंजुळ प्रेमळ आणि कोमळ.

[अंजनीगीत.]

—विना चित्त हें व्याकुल होतें
वृत्ति सदोदित मळूल असते
कर्कश अवघें जग हें झालें
माझें मंजुळ तें !

—विना जगाचा वीट येतसे
केविलवाणा जीव होतसे
कठोरतेची कुऱ्हाड हृदयीं
माझें प्रेमळ तें !

—विना दुःख हें हलकें कैसें
सौख्य खरोखर जड हें तैसें
केवळ कंटक जिकडे तिकडे
माझें कोमल तें !

११ डिसेंबर १९२३.

## मला नकोसा मी.

[दिंडी.]

कांतिवांचुनि मोत्यास मोल नाहीं
स्फूर्तिवांचुनि काव्यास रंग नाहीं
प्रीतिवांचुनि आयुष्य तें निकामी
—तुझ्यावांचुनि बघ मला नकोसा मी !

१३ डिसेंबर १९२३.

## दुष्काळांतलें उत्पन्न.

[ शार्दूलविक्रीडित.]

शेतें ओस–उजाड हीं पसरलीं दुष्काळ चोहींकडे
आहा! चित्त पहा परंतु भरलें, हा जीव तेथें बुडे
दुष्काळांत अशा अपार पिकलें हें शेत माझें किती
त्याचें घाउक मोजमाप लिहिते ही लेखणी बापुडी!

११ डिसेंबर १९२३.

## काळाची निष्ठुरता.

[शार्दूलविक्रीडित.]

त्यानें सुंदर वेल एक अपुल्या दारीं स्वयें लाविली
जीवप्राण जपून लाड करुनी प्रेमामृतें सिंचिली
कोणीं त्यास कधीं असेंहि म्हटलें 'ही प्रीति का रे तुझी?'
वाढे वेल–खरें असेल तरि ती प्रीतीहि वाढे तशी!

आलीं गोड फुलें तिला प्रथम तैं आनंद झाला किती!
त्यांचा रंग, सुवास, मार्दव–जणूं झाली तपःसिद्धि ती!
–शेजारीं कुणि बालिका भय तिला कांहींच ना वाटलें
तीनें तीं खुडिलीं;–पहा नवल–तें सार्थक्य त्या वाटलें!

विद्यासाधन व्हावयास असलें ठेवून मागें धन
गेला तो; सुकुमार वेल सहजीं बाला करी रक्षण.
–तीतें निष्ठुर काल पाश अपुले घालून नेई यदा
सांगूं काय? सुरेख वेल असली वाळून गेली तदा!

१६ डिसेंबर १९२३.

## वस्तु आणि मनुष्य.

[ वसंततिलका.]

आहेत वस्तु जगतीं किति सान थोर
आहेत सर्व उपयुक्त गुणेंच फार
वस्तू गुणाहुनि मनीं न धरी अपेक्षा
कोणी न दर्शवि गुणाविषयीं उपेक्षा.

गर्वे कधीं स्वगुण तूं नच वाढवावा
वेड्या ! कधीं सहजधर्म न तो त्यजावा
अस्तित्व देव तुजला जगतांत देई
स्वत्वें करीं जतन तें निज नाम ठेवीं.

१७ डिसेंबर १९२३.

## औरंगजेब.

बापाला बंदींत घातलें भाऊ केले ठार
अलमूगीर जाहला म्हणोनी मी होणार फकीर.
शिवरायाचें वैर आणखी संभाजीचा घात
केला, यानें करुनि घेतला अपुलाही निःपात.
धर्मासाठीं प्रजेस छळिलें, राज्यासाठीं मुलगे—
दूर ढकलिले, अविश्वासिलें यानें जग अवघें
—परंतु न कळे इतुकें यानें केलें कवणासाठीं
किती अजब हें टोप्या विणल्या—विकल्या पोटासाठीं !

१७ डिसेंबर १९२३.

# दिवा आणि कविता.

[वसंततिलका]

आलों घरीं फिरुनि तों घन रात्र झाली
अंधार व्यापुनि बसे मम सर्व खोली
चित्रें तशा सकल वस्तु तमीं बुडाल्या
शोभा गिळून अपुली बसल्या बुजाल्या !

दिव्यत्वरूप सुविचार अनंत ज्यांत
तेजाळ शब्दकिरणें सुगभीर अर्थ
ते ग्रंथसूर्य अवघे पडले तमांत
खग्रास तें ग्रहण लागुनि त्यांस जात !

लावीयला त्वरित दीप त्वरा करोनी
खोली क्षणांत सजली किरणें भरोनी
'आहे' तयास करितें तम नित्य 'नाहीं'
दीपा उजेड करुनी म्हणतोस 'पाहीं'

—हे जीविता, तिमिर जें तुज ग्रासिताहे
तें तूज नष्ट करण्या असमर्थ आहे
जी ज्योत—दिव्य कविता—हृदयीं प्रकाशे
तीचा प्रभाव इतुका तम सर्व नाशे !

२६ डिसेंबर १९२३.

# अज्ञान.

[चाल—सुकुमार.]

अंतरीं
लपविलें तरी
लपालें नव्हतें
मुग्धपणें उलटें दुःख क्षुब्ध तें होतें !

खिन्नता
दृष्टिशून्यता
भिन्नता भरली
चिंताच जणूं ती मूर्ति होउनी बसली !

रोखुनी
नेत्र फाडुनी
बघे कोणाला
ही काय निराशा ? दिसे न आशा तिजला !

दारांत
नशीबा हात
लावुनी बसली
म्हणतात नियति ती हीच खूण ही पटली !

कल्पना
मृदुल भावना
ज्ञान हें देई
परि जीव तयानें अधिकचि व्याकुल होई !

इतुक्यांत
एक निमिषांत
करि समाधान
तें कोण बरें ? तें ज्ञान नव्हे 'अज्ञान'!

अज्ञान
तान्हुलें छान
पातलें जवळी
माउली तयाला घेई पदराखालीं !

२१ जानेवारी १९२४.

## दुर्भाग्य.

[शार्दूलविक्रीडित.]

येऊनी भरतें वदे भरत तैं रामा, तुझ्यावांचुनी
जातों मी पण एक गोष्ट तुजला ठेवीतसे सांगुनी
जेव्हां हा वनवासकाल सदया, पावेल संपूर्णता
तेव्हां त्याच क्षणीं न भेट तरि मी त्यागीन या जीविता !

उत्कंठा जगते कुठेंतरि असें कांहींतरी लक्षुनी
उत्कंठा मरते तिथें न तिजला तें भेटतां येउनी
ही भावोत्कटता सदोष दिसते जेव्हां जगालागुनी
तेव्हां तोच नव्हे खरोखर जगीं दुर्भाग्य ती लांघुनी ?

२५ जानेवारी १९२४.

## आशेला अंत नाहीं.

[ दिंडी. ]

मधुर कुसुमें मीं मेळविलीं हातीं
तुला देइन ही आस मनीं होती
फुलें गेलीं तत्काल ती सुकून
परी आशा मीं ठेविली जपून !
किती सुंदर चांदणें मना मोही
अधिक मन हें तुजकडे ओढ घेई
पहा गेलें तें चांदणें सरून
परी आशा राहिली मन धरून !
दुःख कांहीं जें जाहलें मनाला
सौख्य कांहीं जें वाटलें मनाला
घडी गेली जरि निघुनि दूर त्याची
तरी आशा तें तुला सांगण्याची !
वस्तु कालानें शीघ्र नष्ट होते
वेळ चंचल न कळतां दूर जाते
जीव परि हा तेथेंच घुमत राही
आणि त्याच्या आशेस अंत नाहीं !

२८ जानेवारी १९२४.

## कृति आणि कीर्ति.

[शार्दूलविक्रीडित.]

कोठें कालवशें सुरम्य कृतिचा अल्पांश राहे तरी
त्यानेंही जगतांत कीर्ति पसरे ही गोष्ट पाहें खरी
कीर्तीच्या सगळ्याच या धडपडी सोडून देऊनिया
आधीं सुंदरशी कृतीच म्हणुनी जा ठेव रेखूनिया.

२७ फेब्रुवारी १९२४.

## परागंदा.

[ दिंडी.]

पूर्वकालीं दंडकारण्यभागीं
कोऽपि मुनिरासीत् वेदमूर्ति योगी
तपश्चर्येवरि करुनि प्रेम भारी
मुनी राहे आजन्म ब्रह्मचारी.

पर्णकुटिका ती जीर्ण मूल्यहीन
तदपि विद्याधनसदन समीचीन
कीर्ति झाली वनवासिनी तदर्थ
उन्नतीनें मानिला स्वर्ग व्यर्थ !

नाम जैसें राहतें पुत्रयोगें
अधिक त्याहुनि गाजलें शिष्ययोगें
—पुढें मुनिचा वृद्धापकाळ येतां
शिष्य श्रीधर एकटा जवळ होता.

रूप त्याचें सुगुणास रूप देई !
सुगुण त्याचे रूपास रूप होई !
बुद्धि त्याची करि सुलभ सकल विद्या !
भक्ति त्याची संपूर्ण ती सपर्या !

गुणी असलें आपुलें शिष्यरत्न
त्वरित आतां जाणार दुरावून
लोभ सुटला तेधवां तपस्व्याला
तसा ब्रह्मानंदही विकल झाला !

अतः एकस्मिन् दिने हृदि विचार्य
निर्वेदाया आपुलें किमपि गुह्य
'वत्स' शब्दें आचार्य मधुर बाहे
शिष्य संनिध सुविनीत उभा राहे.

'लाभ झाला तुज वत्स! आगमाचा
तसा मजलाही तव समागमाचा
कधीं अंतर तेथें न तें पडावें
तरी संसारीं काधिं न त्वां पडावें.'

रुपयौवनसंपन्न शिष्य त्याचा
करी नीरस अर्थ या गुरुवचाचा
—आणि क्रीडारत हरिणयुग्मकाचे—
दर्शनानें नेत्रांत कुतुक नाचे!

रात्रिं आकाशीं चंद्ररोहिणीचा
योग, झाला तो मंत्र मोहिनीचा
—आणि सहजीं सप्तर्षिदर्शनानें
स्वगत वदला 'हीं केवढीं प्रमाणें!

मनीं तें तें सर्वत्र काननांत
क्रौंचमिथुनें गुजगोष्टि बोलतात
भृंग चुंबन घेतसे कमलिनीचें
दृढालिंगन तरुकंठिं वल्लरीचें.

चक्रवाकी शोधितो चक्रवाक
अशीं दृश्यें अवलोकितां अनेक
नदीसंनिध पातला ऋषिकुमार
कुणी बाला सुकुमार नेइ नीर.

वळुनि बघतां मीनल्या उभयदृष्टी
सहज गेली शोभून सकल सृष्टी !
पुनः फुलली मग सृष्टि केधवां ती ?
पुनः जेव्हां मीनल्या उभयदृष्टी !

कुसुम सुंदर हातांत सुवासाचें
ध्यान ऐसें पाहतां कुमाराचें
सहज पाही तों केशबंधनांत
कुसुम नाहीं हें कळुनि तिला येत !

कुमारानें तेधवां निजकरींचें
'सुमन प्रेमासह' अशा मधुर वाचे—
अर्पियेलें सोत्कंठ उभा ठेला
" शूद्रकन्या मी " वदे तदा बाला !

—दिवस पुढला मग उगवला नवीन
स्थलें सगळीं तीं विरूपें नवीन !
आश्रमीं तो मुनिराज उदासीन
नदीतीरावरि युवति कुणी खिन्न !

१३ मार्च १९२४.

## तत्त्व आणि स्थिति.

[ शार्दूलविक्रीडित.]

पैशानें सगळें मिळे पण जगीं दारिद्य हें रोकडें
सत्तेनें सगळें वळे पण जळे चित्तीं सदा वांकडें
ज्ञानानें सगळें कळे पण कळे अज्ञान हें केवढें !
तत्त्वा, फार उदार तूं स्थिति तुझें दारिद्य हें केवढें !

## एक नी एक तीन !

[ दिंडी.]

रंग आणिक पट मिळुनि चित्र झालें !
बीज–भूमींतुनि रोप तिजें आलें !
गणित म्हणतें एक नी एक दोन !
सृष्टि म्हणते एक नी एक तीन !

१४ एप्रिल १९२४.

## विकसन.

[ वसंततिलका.]

हे स्निग्ध मुग्ध कलिके झणिं हो प्रफुल्ल
बोले उताविळ; कळी फुगवीत गाल.
हा राग काय ? कर माफ रहा अशीच
'नाहीं' म्हणून फुलली अपुली सवेंच !

## मैत्री.

[दोहा.]

गोड बोलणें सदा हवें, कारण त्याचें काय?
खाऊसाठीं रुसणारी मैत्री बालिश काय?
जरा कुठें केव्हां होतां लहानमोठी चूक
मरणोन्मुख होते इतुकी मैत्रि काय नाजूक?
'तुटेल ना तर' भीति अशी जिला वाटते फार
त्या मैत्रीला जपून ती किती बरें जगणार?
तोंडदेखलें बोलोनी विसराया निर्व्याज
नाहीं का त्या मैत्रीला मुळीं मनाची लाज!
सत्य नीति निरपेक्षपणा स्वतंत्रता कीं न्याय
कोण एवढी मैत्री कीं यांवरि करि अन्याय?
मित्रा, किंचित घावानें फुटून जाते कांच
घाव घणाचा सोसोनी हिरा फुटेना साच!

१९ एप्रिल १९२४.

## वीज.

[वसंततिलका]

आकाश कृष्णघनवेष्टित सर्व झालें
थोरावरी व्यसन घोर कुठून आलें!
तारे अपार परि एकहि तो दिसेना
कीं संकटांत सुगुणास कुणी बघेना!
विद्युल्लता चमकली इतुक्यांत धीट
गेले दिपून जनलोचन त्या क्षणांत.
उद्गार आणि निघती 'बघ तेथ वीज.'
पाहावयास शिकवीत जनास 'वीज'

२२ एप्रिल १९२४.

# स्वर्गारोहण.

[दिंडी.]

स्वर्ग कोठें येथून असे दूर
कल्पना ही नव्हतीच तिज अघोर;
काळ परि हा अति चपळ करी घाई
दुष्ट दैवें रडविलें धाइधाई!

खोल गेले ते पाणिदार डोळे
दृष्टि अंतर्मुख अंतरीं न्यहाळे
अश्रु तेथें घडिघडी येति जाती
शोधशोधुनि आनंद सर्व नेती!

क्षीण पांडुर निस्तेज तनू दीन
भार दुःखाचा वाहणें कठीण!
मौन मुखिं जें आणि जी मनिं मनीषा
कुणी जाणिल तर तिची अशी भाषाः—

'आण देवापासून सर्व माझें
जरी कांहीं मजसाठिं करायाचें
सुरी किंवा फेकून धीट हातें
पाठवावें त्वां त्वरित मला तेथें!'

असें आहे सामर्थ्य परि कुणाला?
असें आहे धारिष्ट तरि कुणाला?
—तीच अपुल्या निःशक्त पावलांनीं
जाय स्वर्गीं; बहुमानिली सतींनीं!

२४ एप्रिल १९२४.

# निवेदन.

[ दिंडी. ]

सर्व माझी संपत्ति-विपत्ती ही !
उसनवारी येथें न कुणाचीही !
मराठीची वरि पुण्यशील छाया !
अधिक नाहीं मजजवळ निवेदाया !

३ जुलै १९२४.